रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २६९
www.ramprahar.com

मंगळवार, १८ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

तापमानात वाढ झाल्याने काळजी घेण्याचे आवाहन/३

खांबमधील माजी सरपंचासह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश/५

ज्युनियर मुलींची भेंडखळ येथे क्रिकेट निवड चाचणी/८

## राज्यात उष्णतेची लाट; चंद्रपूरमध्ये तापमान ४३.२ अंश



**चंद्रपूर :** राज्यात तापमानाचा पारा सातत्याने वर चढत आहे. चंद्रपूरमध्ये सलग सहाव्या दिवशी उच्चांक गाठला असून सोमवारचे (दि. १७) तापमान ४३.२ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. हे तापमान राज्यात सर्वाधिक असल्याने तेथील नागरिकांना उन्हाच्या झळा सोसवेनाशा झाल्या आहेत. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून चंद्रपुरातील तापमानात वाढ होऊ लागली आहे. मागील सहा दिवसांपासून तर तापमानात मोठी वाढ होत आहे. ११ एप्रिलपासून तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली असून सलग सहाव्या दिवशी तापमानाने उच्चांक गाठला आहे. कोकण विभागातही तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. स्वतःसह कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कोर्लईत अनेक बोगस बंगले

## महिनाभरात मोठे प्रकरण बाहेर येईल -किरीट सोमय्या



**अलिबाग : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई ग्रामपंचायतीमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे कुटुंबीयांचेच १९ बोगस बंगले आहेत असे नाही. हे प्रकरण १९ बंगल्यांपुरते मर्यादित नाही, तर अनेक बोगस बंगले कोर्लईत सापडणार आहेत. महिनाभरात मोठे प्रकरण बाहेर येईल आणि यात अजून दोन जणांना अटक होईल, असा इशारा भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिला आहे.

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आमदार रवींद्र वायकर यांच्या कुटुंबीयांच्या १९ बंगलेप्रकरणी पुढे काय झाले याची माहिती घेण्यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. १७) कोर्लई येथे भेट दिली. त्यानंतर त्यांनी अलिबाग येथे येऊन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेतली. त्यांच्यासमवेत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, दिलीप भोईर, तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, समीर राणे, अशोक वारगे आदी उपस्थित होते.

कोर्लईतील बोगस बंगले प्रकरणाच्या तपासात रोज नवीन माहिती समोर येत आहे. त्यामुळे महिनाभरात या तपासातून मोठे काहीतरी बाहेर येईल. हे प्रकरण १९ बंगल्यांपुरते मर्यादित नाही. कोर्लई गावात आणखी काही असे बंगले आहेत, ज्यात नियमांना बगल देऊन बांधकामे झाली आहेत. सीआरझेड क्षेत्रातही काही बांधकामे झाल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे ठाकरे आणि वायकर यांच्या कुटुंबीयांच्या बंगल्यांपुरते हे प्रकरण मर्यादित राहिलेले नसून आणखीही काही डझन अशाच प्रकारच्या बोगस बंगल्यांसंबधी कागदपत्रे समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती वाढणार असल्याचा दावा सोमय्या यांनी या वेळी केला.

कोर्लई ग्रामपंचायतीच्या हद्दीत किती घरे आहेत याचा खरा आकडा सांगितला जात नाही. प्रत्यक्षात घरे किती आहेत आणि घरपट्टी किती घरांची वसूल केली जाते याची माहिती मिळत नाही. कोर्लईत आणखी काही लोकांनी बंगले बांधण्याचे उद्योग केले आहेत. त्याची कागदपत्रे माझ्याकडे आली आहेत, असेही सोमय्या यांनी सांगितले.

# श्री सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू अत्यंत क्लेषदायक

## घटनेचे राजकारण करू नये -डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यासाठी खारघर येथे आलेल्या काही श्री सदस्यांचा दुर्दैवाने उष्माघातामुळे मृत्यू झाला. हे माझ्यासाठी अत्यंत क्लेषदायक आहे. आपल्याच कुटूंबातील लोकांवर घाला येण्याच्या या घटनेने मी व्यथित आहे, पण या घटनेचे राजकारण करू नये, अशी अपेक्षा ज्येष्ठ निरूपणकार, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी व्यक्त केली आहे.

खारघर येथे घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासानाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यासाठी खारघर येथे आलेले सारे श्री सदस्य हे माझ्या कुटुंबाचे सदस्य आहेत. श्री सदस्यांचा हा परिवार देश-विदेशात पसरला आहे. या पुरस्कार सोहळ्यावेळी उष्माघाताने काही श्री सदस्यांना त्रास झाला आणि त्यातील काहींचा दुर्दैवाने मृत्यू झाला. ही घटना माझ्यासाठी अत्यंत क्लेषदायक आहे. माझ्या कुटूंबातीलच सदस्यांवर कोसळलेली ही आपत्ती आहे. आपल्याच कुटूंबातील लोकांवर घाला येण्याच्या या




घटनेने मी व्यथित आहे. माझे हे दुःख शब्दांत व्यक्त करण्यापलिकडचे आहे. मृत्यू झालेल्या या सदस्यांच्या कुटुंबीयांची आणि माझी वेदना सारखीच आहे.

श्री सदस्य परिवाराची एकमेकांच्या सोबत राहण्याची पिढ्यान् पिढ्यांची परंपरा आहे त्यानुसार आम्ही सारेजण या आपदग्रस्तांसोबत कायम आहोत. यातील मृतांना सद्गती लाभो तसेच त्यांच्या कुटूंबाला हा आघात सहन करण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. झाला प्रकार दुर्दैवीच होता. त्याचे कोणत्याही पद्धतीने राजकारण होऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे, असेही डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी नमूद केले आहे.

## माझे मन जड झालेय!

### ना. अमित शाहांनी व्यक्त केल्या संवेदना



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना राज्य शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार रविवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास लाखो श्री सदस्य उपस्थित होते. रणरणत्या उन्हात त्यांनी आप्पासाहेबांप्रती प्रेमभावना व्यक्त केल्या, परंतु उष्माघाताने १३ जणांचा मृत्यू झाला. केंद्रीय गृहमंत्री शाहांनी मृत श्री सदस्यांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी मराठीत ट्वीट करून आदरांजली वाहिली.

'काल झालेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याला उपस्थित असताना उष्माघाताने प्राण गमावलेल्या श्री सदस्यांच्या जाण्याने माझे मन जड झाले आहे. मृतांच्या कुटुंबियांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. जे लोक उपचार घेत आहेत ते लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी मी प्रार्थना करतो,' अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी रात्रीच रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत सरकारतर्फे केली जाणार आहे, तर उपचारधीन असलेल्यांचा खर्च सरकार करणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## अशा प्रसंगी सर्व पक्षांनी एकत्र यायला हवे -ना. उदय सामंत



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात घडलेली घटना दुर्दैवीच आहे, मात्र या घटनेचे राजकारण करू नये. उलट अशा प्रसंगी सर्व पक्षांनी एकत्र यायला हवे, अशी विनंतीवजा सूचना राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी केली आहे. ते खारघर येथे रविवारी घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

ज्येष्ठ निरूपणकार, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रविवारी खारघरमध्ये भव्य सोहळ्यात महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास लाखोंच्या संख्येने श्री सदस्य उपस्थित होते. यापैकी १३ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे.

मुख्यमंत्र्यांना संध्याकाळी कार्यक्रम घ्यायचा होता, मात्र श्री सदस्यांनी विनंती केली की आम्हाला घरी जायला उशीर होईल. त्यामुळे कार्यक्रम सकाळी घेण्यात आला, असे सांगून ना. उदय सामंत म्हणाले की, कार्यक्रमासाठी ६०० मदतनीस, १५० नर्स, ७३ रुग्णवाहिका होत्या. आमराईत चार हजार बेडचे हॉस्पिटल सज्ज होते. इतर हॉस्पिटलमध्येही बेड राखीव ठेवण्यात आले होते तसेच एक हजार ५० बसेस होत्या. जास्तीत जास्त सुविधा श्री सदस्यांना देण्यात आलेल्या होत्या. **(पान २ वर..)**



**खारघर येथे आयोजित महाराष्ट्र भूषण सन्मान सोहळ्यात उष्माघातामुळे काही श्री सदस्यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त अत्यंत दु:खद आहे. मी या साधकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. उपचाराखातर रुग्णालयात दाखल श्री सदस्यांची प्रकृती लवकर सुधारावी ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो.**

**-आमदार प्रशांत ठाकूर**, रायगड जिल्हाध्यक्ष, भाजप

## निवडक

### 'एनआयए'कडून पुण्यात शाळेचे दोन मजले जप्त

**पुणे :** राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयएने रविवारी पुण्यात ब्लू बेल स्कूलचे दोन मजले जप्त केले. या ठिकाणी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेतर्फे मुस्लिम तरुणांना कट्टरपंथीय बनवण्यासाठी शिबिरे घेतली जात होती तसेच हल्ल्यांसाठी प्रशिक्षण दिले जात होते, असा दावा एनआयएने केला आहे.

### बीसीसीआयचे सचिव जय शाह यांना हॉल ऑफ फेम पुरस्कार

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांना हॅलो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय त्यांना हॉल ऑफ फेम २०२३ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. क्रीडा क्षेत्रातील प्रशंसनीय योगदानाबद्दल शाह यांना सन्मानित करण्यात आले आहे. बीसीसीआयच्या सोशल मीडिया हँडलवरून एक फोटो शेअर करण्यात आला आहे. या फोटोत शाह हा पुरस्कार स्वीकारताना दिसत आहेत.

## पुण्यात होर्डिंग अंगावर कोसळून पाच जणांचा मृत्यू



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याच्या पिंपरी चिंचवडतील किवळे येथे सोमवारी (दि. १७) वादळी पावसात होर्डिंग पडल्याने त्याखाली दबून पाच जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत तीन जण जखमी झाले आहेत.

किवळे, देहूरोड परिसरात सोमवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह जोरात पाऊस झाला. त्यामुळे अनेक नागरिक पावसापासून बचाव करण्यासाठी होर्डिंगच्या आडोशाला थांबले होते. त्याचवेळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळले आणि या होर्डिंगच्या खाली थांबलेले काहीजण त्याखाली अडकले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू, तर तीन जण जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस व अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. होर्डिंग हटवून जखमींना रुग्णालयात हलविण्याचे काम सुरू झाले. बचाव पथकाने एकाला सुखरूप बाहेर काढल्याची माहिती आहे.

# ठाकरे गटाला हायकोर्टाचा दणका

## मुंबई महापालिकेची प्रभाग संख्या पूर्ववत राहणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारच्या काळातील बृहन्मुंबई महापालिकेची प्रभाग संख्या वाढवण्याचा निर्णय रद्द करून ती पूर्ववत करण्याच्या राज्य सरकारच्या नव्या अध्यादेशाला मुंबई उच्च न्यायालयात दिलेले आव्हान सोमवारी (दि. १७) फेटाळून लावण्यात आले. या याचिकेत कोणतेही तथ्य नसल्याने ती फेटाळून लावत असल्याचे हायकोर्टाने आपल्या निकालात म्हटले आहे.

न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर सुनावणी झाली होती. त्यानंतर १७ जानेवारी २०२३ रोजी राखून ठेवलेला आपला निकाल या खंडपीठाने सोमवारी दुपारी ऑनलाईन सुनावणीत जाहीर केला. न्यायमूर्ती चंदवानी हे सध्या नागपूर खंडपीठात कार्यरत असल्याने ते तिथून ऑनलाईन या निकाल वाचनासाठी उपस्थित होते.



बृहन्मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांची नव्याने प्रभाग रचना करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला होता. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या २२७ प्रभागांत नऊने वाढ होऊन ती २३६ करण्यात आली. दरम्यानच्या काळात राज्यात राजकीय सत्तांतर झाले. नव्या सरकारने महाविकास आघाडी सरकारने प्रभागांच्या सीमा रचनेबाबत घेतलेला निर्णय रद्द करून पालिकेच्या प्रभागांची संख्या २३६वरून पुन्हा २२७ करीत तसा अध्यादेश जारी केला. या अध्यादेशाला ठाकरे गटाचे माजी नगरसेवक राजू श्रीपाद पेडणेकर यांनी न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी यांच्या खंडपीठाने सोमवारी या याचिकेवर निर्णय देताना ती फेटाळली.

जनगणनेनुसार लोकप्रतिनिधींच्या जागांची संख्या वाढू शकते असे मानल्यास भारताची लोकसंख्या वाढली म्हणून लोकसभेच्या जागा वाढल्या का, असा प्रश्न राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी हायकोर्टात उपस्थित केला होता. मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी प्रभाग संख्या २३६वरून पुन्हा २२७ करण्याच्या विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका ही कायद्याचा चुकीचा अर्थ लावून करण्यात आल्याचा दावाही महाधिवक्त्यांनी केला. त्यामुळे आगामी निवडणुकीसाठी प्रभाग संख्या वाढवण्याची गरज नाही, असे महाधिवक्त्यांनी स्पष्ट केले होते.

# पनवेलमधील शिवकर, मोहो, पाली येथे रस्ते कामाचा शुभारंभ

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे शिवकर, मोहो, पाली येथील रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध झाला असून या कामांचे भूमिपूजन सोमवारी (दि. १७) भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभाग अनुसूची २५१५-१२३८ अंतर्गत शिवकर ते मोहो रस्ता डांबरीकरण करणे (२० लाख खर्च) आणि मोहो ते मोहो पाडा (१५ लाख) व पाली गाव ते पाली स्मशानभूमी (१५ लाख खर्च) या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामांचा शुभारंभ भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, वांगणी तर्फे वाजे अध्यक्ष सुनील पाटील, शिवकर सरपंच आनंद ढवळे, माजी उपसरपंच तुकाराम टोपले, भाजप गाव अध्यक्ष माया पाटील, युवा कार्यकर्ते शुभ पाटील, हरिश्चंद्र ढवळे, जगदीश ढवळे, शिवकर ग्रामपंचायत सदस्य मंगेश ढवळे, रवींद्र ढवळे, मनीषा ढवळे, रेश्मा पाटील, प्रांजल पाटील ग्रामसेवक सचिन पाटील, प्रवीण म्हात्रे, संतोष शेळके, प्रकाश म्हात्रे, गुरूनाथ भोईर, चेतन शेळके, जयेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## आदित्य ठाकरेंचे निकटवर्तीय अमेय घोलेंचा राजीनामा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या वज्रमूठ सभा आणि उद्धव ठाकरे गटाच्या शिवगर्जना सभांद्वारे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे उरल्यासुरल्या साथीदारांसह अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र त्यांच्या पक्षाला गळती सुरूच आहे. मुंबई महापालिकेचे माजी नगरसेवक अमेय घोले यांनी युवासेनेतील सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. पक्षातील काही नेत्यांच्या त्रासाला कंटाळून हा निर्णय घेत असल्याचे घोले यांनी म्हटले आहे.

माझ्या कामात वारंवार अडथळे आणायचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे अखेरीस जड अंतःकरणाने मला युवासेना सोडण्याचा निर्णय घ्यावा लागतोय, असे घोले यांनी म्हटले आहे.

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरजूंना मिळणार मोफत आरोग्य सुविधा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांना किरकोळ आजारांसाठी चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून तीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व तीन उपकेंद्र लवकरच सुरू होणार आहेत. त्यामध्ये गरोदर मातांसाठी मोफत सोनोग्राफी, मोफत रक्तपुरवठा, टीबी संशयित रुग्णांसाठी मोफत एक्सरेची सुविधा असणार आहे. महापालिका क्षेत्रातील रहिवाशांना वास्तव्याचा पुरावा दिल्यावर या सुविधा मिळणार आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागात नागरिकांना लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य केंद्र उभी करण्याचे आव्हान होते. आरोग्य केंद्र उभारण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करणे, आरोग्य केंद्र व आरोग्य उपकेंद्र चालविण्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची एनयुएचए अंतर्गत नेमणूक करणे आदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पनवेल महापालिका क्षेत्रात तीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व तीन नागरी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उभारण्यात आली आहेत. किरकोळ आजारांवर या उपकेंद्रांमधून सर्वसामान्य नागरिकांना उपचार मिळणार असल्यामुळे केंद्र फायदेशीर ठरणार आहेत. याशिवाय **(पान २ वर..)**

### गर्भवतींना सोनोग्राफी, रक्तपुरवठा, टीबी संशयित रुग्णांसाठी एक्सरेची व्यवस्था



***गर्भवती महिलांना मोफत सोनोग्राफी, रक्तपुरवठा, टीबी संशयितांना मोफत एक्सरे आदी सुविधा देण्यासाठी महापालिकेला पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे मोफत सोयीसुविधा महापालिका क्षेत्रात राहण्याचा पुरावा असेल तरच दिल्या जाणार आहेत. इतर नागरिकांना या सुविधा मिळणार नाहीत.***

**-डॉ. आनंद गोसावी**, मुख्य आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका

# अशा चर्चा खूप होतात; 'जर तर'ला अर्थ नसतो!

## अजित पवारांबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी ८ एप्रिलला गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याचे वृत्त एका इंग्रजी वर्तमानपत्राने दिले आहे. यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. अशातच सोमवारी (दि. १७) अजित पवारांनी आपले पुण्यातील सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत. तर, दुसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार आशिष शेलार दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यामुळे चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, अजित पवारांना बरोबर घेऊन सरकार स्थापन करणार का? असा प्रश्न विचारल्यावर बावनकुळेंनी सांगितले, अशा चर्चा खूप होत असतात. 'जर तर'ला जीवनात अर्थ नसतो.

यावर चंद्रशेखर बावनकुळेंनी स्पष्टीकरण दिलं आहे. ते दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. केवळ प्रशासकीय कामासाठी दिल्लीला आलो आहे. नागपुरातील एनटीपीसी प्रकल्पाच्या संदर्भातील प्रश्नासाठी देशाचे उर्जामंत्री आर. के. सिंग यांच्याकडे बैठक आहे. तर, आशिष शेलार हे मुंबईवरून दिल्ली आणि नंतर बँगलोरला जातील. त्यामुळे कोणत्याही राजकीय कामासाठी आलो नाही.



अजित पवारांनी पुण्याचे दौरे रद्द केलेत? असं विचारलं असता बावनकुळेंनी म्हटलं, याबद्दल मला काहीच माहिती नाही. अजित पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही. त्यामुळे मला याबद्दल कोणतीही माहिती नाही.

अजित पवार भाजपात आपल्यावर स्वागत करणार का? असे विचारल्यावर बावनकुळे म्हणाले, देव, देश आणि धर्म ही आमची काम करण्याची पद्धत आहे.

कालपर्यंत कोणत्या विचारधारेत होता, माहिती नाही. पण, आमच्या पक्षात आल्यावर विचारधारेच्या आधारावरच काम करावं लागतं. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा संकल्प आम्हाला पूर्ण करावा लागतो. त्यामुळे आमच्या विचारधारेशी सहमत असाल, तर आमचा विरोध नाही.

### हा महिना संपूर्ण पक्षप्रवेशाचा असणार

भाजपात प्रत्येक बुथवर २५ कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश आम्ही घेतोय. ३० एप्रिलच्या 'मन की बात' कार्यक्रमापर्यंत २५ लक्ष पक्षप्रवेश भाजपात होणार आहेत. हा महिना संपूर्ण पक्षप्रवेशाचा असणार आहे. १ लक्ष बुथवर आमचे कार्यकर्ते काम करतात. राज्यातील ७०० पदाधिकारी प्रत्येक बुथवर जात आहेत, अशी माहितीही चंद्रशेखर बावनकुळेंनी दिली आहे.

# वादळी पावसाने साळोख, कळंब परिसरात घरांचे नुकसान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ११ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह आलेल्या गारपीट पावसाने साळोख ग्रुप ग्रामपंचायतमधील स्थानिकांच्या घरांचे मोठे नुकसान केले आहे. त्यानंतर शेतकऱ्यांनी स्थानिक तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली आहे. मात्र अद्याप कोणताही अधिकारी पंचनामे करण्यासाठी पोहचलेला नाही.

कर्जत तालुक्यात ११ एप्रिल रोजी कळंब आणि कशेळे भागात वादळ आले होते. त्या वादळासोबत अनेक भागात गारपीट झाली आणि त्या गारपीट मध्ये आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले. त्यावेळी आलेल्या वादळाने कळंब आणि साळोख ग्रामपंचायत मधील घरांचे नुकसान झाले आहे. कळंब येथील मुरबाड रस्त्याच्या बाजूला असलेल्या जीमच्या शेडवरील पत्रे उडून थेट रस्त्यावर येऊन कोसळले. मात्र त्यावेळी कोणतेही वाहन अथवा रस्त्याने वाटसरुंची ये-जा नव्हती आणि त्यामुळे मोठा अपघात झाला नाही. याच भागातील साळोख ग्रुपग्रामपंचायतमधील माले कातकरी वाडीमधील कातकरी समाजाच्या रहिवाशांची घरांचे मोठे नुकसान झाले आहे. कातकरी वाडीमधील चद्रकांत दशरथ वळवे, पदु जाणु वाघ, रमेश मंगळ वळवे यांच्या घरावरील छपरं उडून गेले असून त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

याबाबत स्थानिक कार्यकर्त्यांनी महसूल विभागाचे तलाठी आणि मंडळ अधिकारी यांना फोन द्वारे वादळाने झालेले नुकसान यांची पाहणी करण्याची सूचना केली आहे. मात्र अद्याप कोणताही महसूल विभागाचा अधिकारी कर्मचारी घटनास्थळी साळोख ग्रामपंचायतमध्ये पोहचला नाही.

# बंडू खंडागळे यांची राष्ट्रीय गुरव महासंघ प्रदेश उपाध्यक्षपदी निवड




**पेण : प्रतिनिधी**

औरंगाबाद येथे रविवारी (दि. १६) राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार विजयराजे शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश आणि महाराष्ट्र राज्य पदग्रहण समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब शिरसागर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव, महामंत्री गणेश सुरडकर, कोषाध्यक्ष गणेश फुलारी, राष्ट्रीय उपाध्यक्ष अनुपमा मुरलीधर गुरव यांची एक मताने निवड झाली असून या पदग्रहण समारंभात गुरव समाज संस्थेचे अध्यक्ष बंडू खंडागळे यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

संपूर्ण महाराष्ट्रातुन तसेच कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, गोवा, येथील अनेक समाज बांधव या पदग्रहण समारंभासाठी उपस्थित होते. अन्य राज्यांमधून कधी नव्हे एवढा गुरव समाज मोठ्या प्रमाणामध्ये संघटित होत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये यापुढील काळात संत काशीबा आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजातील गोरगरीब युवा, युवती, उद्योजक, शेतकरी आणि विद्यार्थी तरुणांना महिला भगिनी यांना महामंडळाच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तसेच यावेळी गुरव विकास प्रतिष्ठान मुंबई अध्यक्ष नवलजी शेवाळे यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी अनेक प्रमुख महाराष्ट्रातून उपस्थित असलेल्या समाज बांधव बंधू- भगिनी यांची अनेक जबाबदारीच्या पदावर ती नियुक्ती करण्यात आली आहे. पदग्रहण कार्यक्रमासाठी गुरव समाज रायगड ठाणे मुंबई संस्थेचे कार्याध्यक्ष विजय साळुंखे, उपाध्यक्ष किशोर गुरव, सहखजिनदार संजय मोरे, सदस्य सचिन गुरव, सोशल मीडिया प्रमुख हरेश खंडागळे उपस्थित होते.

# माथेरान मिनीट्रेनच्या प्रवासाची ११६ वर्षे पूर्ण

**कर्जत : विजय मांडे**

मुंबईतील पारसी व्यापारी आदमजी पिरभोय यांनी १९०७मध्ये नेरळ येथून माथेरानला जाण्यासाठी नारगेज ट्रॅक बनवून मिनीट्रेन सुरू केली. ही मिनीट्रेन सुरू झाली त्या दिवसाला नुकतीच ११६ वर्षे पूर्ण झाली असून या काळात मिनीट्रेनने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत.

१८५७मध्ये ठाण्याचे कलेक्टर ह्यूज मेलेट यांनी शोध लावल्यावर रामबागमार्गे माथेरानमध्ये ब्रिटिश अधिकारी येऊ लागले. थंड हवेचे ठिकाण म्हणून शोधलेल्या या ठिकाणी नंतरच्या काळात सरकारी कचेऱ्या सुरू झाल्या. १९०५मध्ये माथेरान गिरीस्थान नगर परिषद, पोस्ट ऑफिस, टेलिग्राम केंद्र ही ब्रिटिशांची देणं होत. त्या काळी मुंबई येथून पनवेल, उलवे, चौक असे पुढे रामबागमार्गे चालत आणि घोड्यावर किंवा डोलीत बसून माथेरानला ब्रिटिश अधिकारी व मुंबईतील धनिक समजले जाणारे पारसी लोक यायचे. पुढे सन १८५४मध्ये मुंबई-पुणे मार्गावर रेल्वे चालू झाली आणि १८५६ ला ती ट्रेन नेरळ अशी खोपोलीपर्यंत पोहचली. त्यामुळे नेरळ येथे रेल्वे ट्रेन असल्याने नेरळ येथून माथेरान असा प्रवास सुरू झाला होता.





घोडा किंवा डोलीत बसून माथेरानला जाण्याचा मार्ग १८५७मध्ये विकसित करण्यात आला होता. १९००च्या दरम्यान मुंबईचे नगरपाल असलेले सर आदमजी पिरभाय आणि त्यांचा मुलगा हुसेन अब्दुल पिरभाय हे माथेरान जाण्यासाठी नेरळ येथे आले असता अंधार झाला होता आणि त्यामुळे त्यांना माथेरान येथे जाण्यासाठी डोली उपलब्ध झाली नाही. तेव्हा पिरभाय पिता-पुत्राने माथेरान येथे जाईन तर ट्रेन घेऊनच जाईन असा निर्णय घेतला आणि आदमजी पीरभाय व त्यांचा इंजिनियर मुलगा अब्दुल हुसेन पिरभाय यांनी नेरळ ते माथेरान या अत्यंत अवघड घाटातून रेल्वे नेण्यासाठी १९०१मध्ये सुरवात केली. १५ एप्रिल १९०७ रोजी नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर नेरॉगेज मार्गावर नेरळ-माथेरान-नेरळ अशी मिनीट्रेन सेवा सुरू झाली. रेल्वेच्या या कामाकरिता एकूण त्यांनी १६ लाख रुपये स्वतः खर्च करून मार्ग उभारला आणि मिनी ट्रेनसेवा सुरू केली. १९०७ रोजी माथेरान नेरळ माथेरान या नेरोगेज रेल्वे मार्गावर पहिली मिनी ट्रेन धावली. त्या घटनेला आता ११६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात मिनी ट्रेनने अनेक स्थित्यंतरे पाहिली. १९७२मध्ये तीन वर्षे चाललेल्या रेल्वे संपात ट्रेन बंद होती. त्या वेळी स्थानिक ग्रामस्थांनी माथेरान-नेरळ घाटरस्ता श्रमदान करून तयार केला आणि आज हाच एकमेव रस्ता घाटरस्ता म्हणून ओळखला जातो.

### जागतिक वारसा म्हणून नामांकन मिळविण्यासाठी सज्ज

*तसेच अतिवृष्टीमुळे रेल्वेमार्ग वाहून गेला होता त्या वेळीसुद्धा ती काही दिवस बंद होती. पूर्वी वाफेच्या इंजिनवर चालवली जाणारी मिनीट्रेन आता डिझेलवर चालवली जात आहे तर पूर्वी मिनीट्रेनच्या प्रवासात दोन बोगींमध्ये ब्रेक पोर्टर असायचे आणि त्यांच्या माध्यमातून ब्रेक लागले जायचे. आज एअर ब्रेकसेवा सुरू झाली असून वातानुकुलित सेवादेखील मिनीट्रेनमध्ये मिळते. विस्टा डोम प्रवासी डब्बादेखील प्रवाशांच्या सेवेत आहे. दुसरीकडे या गाडीमध्ये अनेक बदल करण्यात आले असून ही मिनीट्रेन जागतिक वारसा म्हणून नामांकन मिळविण्यासाठी सज्ज आहे.*

# पुण्यात रस्त्यावर तेलाचा टँकर उलटला



**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या वतीने नवले पूल परिसरात घडणाऱ्या वारंवार अपघाताच्या मालिकेच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये या परिसरात महामार्गावर ठिकठिकाणी रंबलर्स बसविण्यात आले आहेत. मात्र, अपघातांचे सत्र थांबण्याचं नाव घेत नाही. नवले पुलावर आज पुन्हा एका टँकरचा अपघात झाला आहे. हा टँकर खोबरेल तेल घेऊन सातारापासून मुंबईच्या दिशेने निघाला होता. मात्र, ब्रेक फेल झाल्याने टँकरचा अपघात झाला. नऱ्हे येथील सेल्फी पॉइंट जवळ ही घटना घडली. या अपघातात टँकरमधील तेल सांडल्याने महामार्ग निसरडा झाला आहे.

नवले पुलावर सातत्याने अपघात होत असताना आज पुन्हा एका टँकरचा अपघात झाला. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. चालक सुद्धा बचावला गेला आहे आणि सुखरूप आहे. खोबरेल तेल घेऊन निघालेल्या टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या मध्ये असलेल्या दुभाजकाला धडकून टँकर महामार्गावर उलटला आहे. या अपघातात टँकरमधील २४ हजार लिटर खोबरेल तेल रस्त्यावर सांडले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात तेल सांडल्याने रस्त्यावर तेलाची नदी पाहू लागली होती. त्यामुळे वाहतूक मंदावली असून रस्त्यावर तेल असल्याने अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. या घटनेनंतर महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. महामार्गावरील वाहतूक संथ गतीने पुढे जात आहे. या अपघातानंतर घटनास्थळी वाहतूक पोलीस, तसेच राष्ट्रीय महामार्ग पेट्रोलिंग विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी पोहचले आहेत. रस्त्यावरून तेल काढण्याच काम सुरू आहे. तरी या रस्त्यावरुन जाताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुद्रांक विक्रेता रायगडची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**रोहे : प्रतिनिधी**

धुळे येथे झालेल्या मुद्रांक विक्रेता बचाव अधिवेशनात कोकण विभाग उपाध्यक्ष व रायगड जिल्हा संघटक दीपक सरवटे यांच्या उपस्थितीत रायगड जिल्ह्यातील हजर असलेल्या सर्व मुद्रांक विक्रेत्यांनी स्वतंत्र बैठक घेऊन रायगड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

भिका चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे झालेल्या मुद्रांक विक्रेता बचाव या अधिवेशनसाठी तीन हजार मुद्रांक विक्रेते उपस्थित होते. या अधिवेशनात मुद्रांक विक्री मर्यादा ३०००० करावी, देण्यात येणारे कमिशन किमान पाच टक्के करावे, मुद्रांक विक्रेत्यांना त्यांच्या हयातीत वारसांचे नावे अथवा त्यांचे मृत्यू पश्चात वारसांना परवाना दिला जावा अशा मागण्या शासनाकडे करण्यात आले आहेत. या मागण्या शासनाने लवकरात लवकर मान्य करावे मान्य न केल्यास महाराष्ट्र सरकारच्या पावसाळी अधिवेशनात आझाद मैदानावर आमरण उपोषण व संपूर्ण महाराष्ट्रात मुद्रांक विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

रायगड जिल्हा संघटक दीपक सरवटे यांच्या उपस्थितीत रायगड जिल्ह्यातील हजर असलेल्या मुद्रांक विक्रेत्यांनी स्वतंत्र बैठक घेऊन रायगड जिल्हा कार्यकारणी निवड करण्यात आली या कार्यकारणी मध्ये कोकण विभाग उपाध्यक्ष दीपक सरवटे, रायगड जिल्हा संघटक रघुनाथ माळी, कार्याध्यक्ष हबीब खोत, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वाणी, जिल्हा उपाध्यक्ष सुनील परदेशी, सचिव संजय गायकवाड, खजिनदार समीर संसारे, सदस्य कैलास वाडेकर, अनिल मोरे, जयवंत म्हात्रे, सतीश वागळे, श्रीमती संध्या पाटील, श्रीमती वर्षा तेंडुलकर आदींची निवड करण्यात आली.

सर्व नवनिर्वाचित कार्यकारणीचे मुद्रांक विक्रेता व दस्त लेखक महाराष्ट्र राज्याचे महासंघाचे पदाधिकारी भिका चौधरी, दिलीप देवरे, राहुल नाईक, विनोद जोशी आदींनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ कायम राहणार

**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून कोसळत असलेला अवकाळी पाऊस पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. जोपर्यंत दक्षिण भारतातील वारा खंडितता प्रणाली बदलत नाही किंवा नामशेष होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील अवकाळी पावसाची स्थिती कायम राहणार आहे. त्यामुळे राज्यामध्ये या आठवड्यातही पावसाळी वातावरण कायम असून विविध जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रविवारी दिलेल्या हवामान अंदाजानुसार, पालघर जिल्ह्यात मंगळवारी आणि बुधवारी यलो अलर्ट असून ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यातही बुधवारसाठी यलो अलर्ट दिला आहे. या काळात मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027084** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-20/2023-2024. RFx E-Tender for Work of Surveillance of MMR Region EHV connected lines for attending any abnormalities during high demand crunch period to occur in upcoming April - May 2023 under EHV Lines S/Dn., Panvel under EHV (O&M) Division Panvel. |
| 2 | Online Downloading of the RFx | 18.04.2023, 18:00 Hrs to 25.04.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 25.04.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 26.04.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**


पान १ वरून

### अशा प्रसंगी सर्व पक्षांनी एकत्र यायला हवे -ना. उदय सामंत

ना. सामंत पुढे बोलताना म्हणाले की, मागील दोन दिवसांत अचानक वातावरण बदलले. त्यामुळे तापमान वाढले. अनेक लोक कार्यक्रमासाठी आदल्या दिवशीच आलेले होते. श्री सेवक ज्या श्रद्धेने आले होते त्यांना थांबवणे कठीण होते. कार्यक्रमात २० ते २२ लाख लोक सहभागी झाले होते. प्रशासनाने हुकूमशाही करून कार्यक्रम आयोजित केला नव्हता, मात्र याच्यातही राजकारण केले जाते हे दुर्दैवी आहे. या घटनेचे समर्थन करता येणार नाही, पण यावर सांघिकपणे सर्वांना दिलासा देणे आवश्यक आहे.

### पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरजूंना मिळणार मोफत आरोग्य सुविधा

गर्भवतींसाठी सोनोग्राफी आणि मोफत रक्तपुरवठा करण्याची सुविधा सुरू केली जाणार आहे. पूर्वीच्या सहा आरोग्य केंद्रांजवळील खासगी लॅबमध्ये सोनाग्राफी मोफत काढता येणार आहे तसेच गरज भासल्यास मोफत रक्तपुरवठादेखील केला जाईल.

खांदा कॉलनीतील रोटरी ब्लडबँक आणि साई ब्लडबँक या दोन रक्तपेढ्यांमधून मोफत रक्तपुरवठा केला जाणार आहे. याचा खर्च पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून केला जाणार आहे. महापालिकेच्या सहा आरोग्य केंद्रांमध्ये दर गुरुवारी येणाऱ्या ४० ते ५० गरोदर मातांना याचा लाभ होऊ शकतो. आरोग्य केंद्राची संदर्भ चिठ्ठी असल्यास महापालिकेशी करारनामा केलेल्या लॅब संबंधितांची कोणतेही शुल्क न आकारता तपासणी करणार आहेत. याशिवाय खासगी प्रयोगशाळांमध्ये आजारांचे निदान होण्यासाठी केल्या जाणाऱ्या तपासण्यांची माहिती महापालिकेला मिळावी म्हणून महापालिकेने विकसित केलेले सॉफ्टवेअरवर दररोज टाकणे लॅबना बंधनकारक असणार आहे. टीबी संशयित रुग्णांचे मोफत एक्सरे काढण्यात येणार आहेत. खासगी लॅबमध्ये ४०० ते ४५० रुपये येणारा खर्च रुग्णांना महापालिकेकडून मोफत केला जाणार आहे. त्यामुळे गर्भवती मातांसोबत संशयित टीबी रुग्णांसाठी मोफत सुविधा महापालिका देणार आहे.

# राम मंदिरासाठी एक कोटीची देणगी देणाऱ्या महंतांवर काळाचा घाला

**बिहार : वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातील नरसिंगपूर येथून एक दु:खद बातमी समोर आली आहे. ती म्हणजे महंत कनक बिहारी महाराज यांचा बरमन-सागरी राष्ट्रीय महामार्ग-४४ वर झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला आहे. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या नादात त्यांची कार दुभाजकाला धडकून पलटी झाली, ज्यामध्ये महाराजांसह इतर दोघांना आपला जीव गमवावा लागला. तर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

महंत कनक बिहारी दास महाराजांनी अयोध्येत उभारल्या जाणाऱ्या राम मंदिराच्या उभारणीसाठी एक कोटीहून अधिक देणगी दिली होती. तेव्हापासून त्यांचे नाव खूप चर्चेत होते. रघुवंश शिरोमणी १००८ म्हणून ओळखले जाणारे कनक बिहारी दास महाराज हे रघुवंशी समाजाचे राष्ट्रीय संत म्हणूनही ओळखले जायचे. महाराजांचा आश्रम मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील नोनी येथे होता. महाराज उत्तर प्रदेशातील प्रयागराजहून छिंदवाडा येथे परतणार होते. पण बरमान-सगरी राष्ट्रीय महामार्ग-४४ वर झालेल्या भीषण अपघात त्यांचा मृत्यू झाला.

रघुवंशी समाजाचे नरसिंहपूर जिल्हाध्यक्ष राजकुमार रघुवंशी यांनी सांगितले की, महंत कनक महाराज यांनी राम मंदिरासाठी एक कोटी रुपयांची देणगी दिली होती. याशिवाय १० फेब्रुवारी २०२४ पासून ते अयोध्येत ९ कुंडीय यज्ञ करणार होते. त्याच्या तयारीसाठी ते रघुवंशी समाजाच्या सर्व गावांना ते भेटी देत होते. सोमवारी ते छिंदवाडा येथे जात असताना गुना जिल्ह्याजवळ बाईकस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांची कार दुभाजकावर आदळली आणि त्यातच त्यांना जीव गमवावा लागला. महाराजांसोबत कारमधून प्रवास करणारे छिंदवाडा येथील विश्राम रघुवंशी यांचाहा अपघातात मृत्यू झाला. तर आणखी एका शिष्याचा मृत्यू झाला आहे. अपघातात महाराजांसह अन्य दोघांचा अकाली मृत्यी झाल्याने समाज व परिसरात शोककळा पसरली आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027083** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-19/2023-2024. RFx E-Tender for AMC for Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220kV Taloja, Uran and ONGC Panvel Substation under EHV (O&M) Division, Panvel. |
| 2 | Online Downloading of the RFx | 18.04.2023, 18:00 Hrs to 25.04.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 25.04.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 26.04.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# तापमानात वाढ झाल्याने काळजी घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या तातेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना



## दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट

आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा.

उष्माघात होऊ नये म्हणून तहान लागलेली नसली तरीसुद्धा जास्तीत जास्त पाणी प्यावे, हलकी, पातळ व सच्छिंद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. कोकणातील जनतेने काळजी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.

## थंड पेय, फळांना वाढती मागणी

गेल्या आठवडाभरापासून पनवेल शहर आणि परिसरातील तापमान कमालीचे वाढल्याने सारेच हैराण झाल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शरीराला थंडावा मिळावा म्हणून आता थंड पेयांना मागणी वाढली आहे. आरोग्यपूरक फळांनाही आता चांगला भाव आलेला आहे. ठिकठिकाणी गल्लोगल्लीत बर्फाचे गोळे विक्रेते फिरताना दिसत आहेत. बाजारात लिंबांनाही चांगला भाव आलेला आहे. याशिवाय थंडगार सब्जाही



विकला जात आहे. बाजारात द्राक्षे, कलिंगडांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. रसवंतीगृहातही गर्दी होत आहे.

# चिरनेर चांदायली वाडीतील आदिवासींची पाण्यासाठी कसरत

**उरण : वार्ताहर**

चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या चांदायली आदिवासी वाडीतील बांधवांना घोटभर पाण्यासाठी दररोज संघर्ष करावा लागत आहे. आंघोळ, कपडे धुण्यासाठी पाणी मिळणे सोडाच, पण प्यायलादेखील पाणी मिळेल की, नाही अशी भयंकर परिस्थिती येथे ओढावली आहे. आदिवासींना दररोज विहिरीत जीवघेणी कसरत करीत, उतरून पाणी खरबडून भरावे लागत आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील केळाचा माळ व चांदायली आदिवासी वाडीतील बांधवांना पिण्याचे पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. पाण्याचे एकमेव स्त्रोत असणाऱ्या विहिरीतील कपारीत असलेल्या पाण्यासाठी या आदिवासींना दररोज विहिरीचा तळ गाठावा लागत आहे, तरच थोड्याफार प्रमाणात घोटभर पाणी त्यांना उपलब्ध होते. विहिरींनी तळ गाठल्यामुळे या वाडीवर वास्तव्यास असलेल्या ५०–६० लोकांना ते पाणी पुरत नसल्याने, या आदिवासी बांधवांना भाड्याची रिक्षा करून चिरनेर गावातून पाणी आणण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. सर्वच आदिवासींना हा खर्च परवडत नसल्याने अनेकांनी स्थलांतर करून वीटभट्टीवर आश्रय घेतला आहे.

ग्रामपंचायतीकडे वेळोवेळी मागणी करूनदेखील या आदिवासी बांधवांना पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला जात नसल्यामुळे आदिवासी बांधवांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## निवडक

### अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी गंभीर

**पनवेल** : चिंचपाडा ब्रिजखाली पिण्याचे पाणी आणण्याकरीता गेलेल्या पादचाऱ्याला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोराची ठोकर मारल्याने त्यांचा डावा पाय फॅक्चर झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे येथे राहणारे राजेश कुमार केवट (वय ३०) हा इसम चिंचपाडा ब्रिजखाली पिण्याचे पाणी आणण्याकरीता गेले असता, अज्ञात वाहनाने राजेशला पाठीमागून जोराची ठोकर दिली. यामुळे त्यांचा डावा पाय फॅक्चर झाला असून अज्ञात वाहनचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पनवेलमध्ये आढळला अनोळखी मृतदेह

**पनवेल** : पनवेल परिसरातील कोळीवाडा येथे एका ४० ते ४५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. पनवेल शहर पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. अनोळखी इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून रंगाने सावळा, उंची पाच फूट चार इंच, केस काळे मध्यम वाढलेले, चेहरा उभट, दाढी मध्यम वाढलेली, अंगाने मध्यम, अंगात नेसूस फूल बाह्याचा तपकीरी शर्ट, निळी फुल पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस दूरध्वनी (०२२–२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पाणदिवे येथील नेत्रतपासणी, मोतीबिंदू शिबिराला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

आरोग्याच्या सेवा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचाव्यात या अनुषंगाने शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, आम्ही पाणदिवेकर समूह, आई इंटरप्रायजेस पाणदिवे, न्हावा शेवा सीएचए संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १६) पाणदिवे येथील श्री दत्त मंदिरात मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, माफक दरात चष्मे वाटप करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन आई इंटरप्रायजेसचे किरण पाटील, अतुल पाटील यांनी केले. आम्ही पाणदिवेकर समूहाचे प्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते अमित पाटील, आई इंटरप्रायजेसचे मालक किरण पाटील, अतुल पाटील, न्हावा शेवा सीएचए संघटनेचे अध्यक्ष रुपेश भगत, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली.

१७५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर २३ रुग्णांना मोफत मोतीबिंदू ऑपरेशनसाठी पुढे हॉस्पिटलला पाठविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद म्हात्रे यांनी तर आभार प्रदर्शन विठ्ठल ममताबादे यांनी केले.



# सीकेटी महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात नॅशनल कॅडेट्स कौर (एनसीसी) विभागाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंतीचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. उद्धव तुकाराम भंडारे आणि केअर टेकर ऑफिसर प्रा. एन. पी. तिदार यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाच्या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी रॅली काढून रोटरी क्लबतर्फे भरविण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तक प्रदर्शनात कॅडेट्स सहभागी झाले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. उद्धव तुकाराम भंडारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता यावर मार्गदर्शन केले, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुद्धवंदना करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या कार्याक्रमात ३५ कॅडेट्सनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू. ए.सी.समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# संजय होळकर यांना सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार



**उरण : वार्ताहर**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद मुंबई प्रदेश व नवी मुंबई जिल्हा आयोजित सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय साहित्य संमेलनामध्ये रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा मोठी जुई या शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आदर्श शिक्षक संजय होळकर यांना सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्यांनी केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक सामाजिक, कला, क्रीडा व साहित्यिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद शरद गोरे तसेच राजश्री बोहरा, संमेलन अध्यक्ष स्वीकृत खांडेकर, डॉ. राम नेमाडे आदींच्या हस्ते देऊन करण्यात आला.

या वेळी सर्व उपस्थित मान्यवर व साहित्यिकांचे ढोल, लेझीमच्या वादनाने मनपा मराठी शाळा गोवंडीच्या मुलांनी केले, तसेच ईशस्तवन व स्वागतगीत सादरीकरणाने, सावित्रीबाई व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यथोचित सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पुढे परिसंवाद व राज्यातील विविध कविवर्य आपापल्या स्वलिखित कविता सादरीकरण झाले. संजय होळकर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पनवेलमध्ये मैत्रेय प्राणिक हिलींग उपचार पद्धतीचे सेंटर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये एक आगळ्या वेगळ्या उपचार पद्धतीचे प्राणिक हिलींग सेंटर सुरू करण्यात आले आहे. मेघना संजय कदम यांचे मैत्रेय प्राणिक हिलींग सेंटर उषा लक्ष्मी अपार्टमेंट, विरुपाक्ष मंदिरासमोर, जुना पोस्ट ऑफिसमार्ग येथे सुरू करण्यात आले आहे. या वेळी मुख्य ट्रेनर प्रीती कुलकर्णी, प्राणिक हिलर सई कुलकर्णी, प्राणिक हिलर विद्या पवार, प्राणिक हिलर प्रसाद हनुमंते आणि इतर उपस्थित होते.

प्राणिक हिलींग ही फार जुनी आरोग्य उपचाराची अनोखी पद्धत आहे. कुठल्याही प्रकारचे औषध न घेता आजारावर उपचार करण्याची ही पद्धत आहे. या पद्धतीत प्राणिक हिलर आजारी व्यक्तीला कोणतेही मेडिसिन न देता आणि कसलाही स्पर्श न करता हिलींगद्वारे उपचार करतो. आजवर अनेक व्यक्तींनी याचा अनुभव घेतला आहे. त्यांचे आजार बरे झाले आहेत. विशेष म्हणजे आपणही स्वतःला किंवा इतरांना



हिलींग करू शकता. फक्त त्यासाठी आपल्याला कोर्स करणे महत्त्वाचे आहे. आता पनवेलमध्येही हिलींग सेंटर सुरू झाले आहे. सध्या नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई याचे कोर्स चालू असून लवकरच या सेंटरवरही चालू होणार असल्याचे मेघना कदम यांनी सांगितले. हा कोर्स शिकण्यासाठी जे कोणी शिकण्यास इच्छुक असतील त्यांनी (७६६६३२७००९) या नंबर वर संपर्क करावा. तसेच उपचारासाठी (८३६९७६५९०७/९९३००९१५१६/९८९२७१५४७२/९८६७९००५५२) यानंबर संपर्क करावा असे आवाहन मैत्रेय प्राणिक हिलींगतर्फे करण्यात आले आहे.

# श्री सदस्यांच्या मदतीसाठी कार्यकर्ते सरसावले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना प्रदान करण्यात आला. सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी लाखो श्री सदस्य उपस्थित होते, परंतु उन्हाळ्याचे दिवस असून पारा ४०च्या वर गेल्याने त्यातील १२ श्री सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून २० ते २५ श्री सदस्य उपचार घेत आहेत. रविवारी रात्री तातडीने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रुग्णालयात भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर कळंबोली, खारघर, पनवेल विभागातील सर्व कार्यकर्त्यांनी आवश्यक तिथे हॉस्पिटलला भेटी देत असून रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना सर्वतोपरी सहकार्य करीत आहेत, अशी माहिती महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षातर्फे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक ते सर्व सहकार्य पोहोचवण्याचे काम सुरू असल्याबाबतची माहिती महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी दिली.

# रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ








**पनवेल** : राज्य शासनाच्या ग्रामविकास विभाग अनुसूची २५१५–१२३८ अंतर्गत शिवकर ते मोहो रस्ता डांबरीकरण करणे तसेच मोहो ते मोहो पाडा व पाली गाव ते पाली स्मशानभूमी या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामांचा शुभारंभ भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी झाला. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय


# राजकारण नको!

कुठल्याही राजकारणाला थारा न देणाऱ्या धर्माधिकारी कुटुंबियांना उष्माघातानंतर आता राजकारणाचे चटके सोसावे लागत आहेत ही दुर्दैवाची बाब आहे. ही दुर्घटना घडल्यानंतर आदरणीय आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी आपल्या घरासमोरील श्रीसेवकांनी केलेली फुलांची सजावट आणि रांगोळी पुसून टाकली. माझ्या कुटुंबावर दु:खाचा प्रसंग आला आहे. या दुर्घटनेचे कुणी राजकारण करू नये, असे आवाहन अप्पासाहेब धर्माधिकारी यांना करावे लागले हीच उद्वेगजनक बाब आहे.

**थोर समाजसेवक, ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांना समारंभपूर्वक महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला, तो खरे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी आनंदाचा, समाधानाचा आणि कृतज्ञतेचा क्षण होता असे म्हटले पाहिजे. नवी मुंबईतील खारघर येथील मैदानावर हा सोहळा बघण्यासाठी तब्बल ३० लाख 'श्रीसदस्य' जमले होते. तळपत्या उन्हात बसून त्यांनी आपल्या परम दैवताचा सन्मानसोहळा कृतार्थतेच्या भावनेने पाहिला, परंतु या ऐतिहासिक उत्सवाला गालबोट लागले. तळपत्या उन्हात शांतपणे बसून राहिलेल्या श्री सदस्यांना उष्माघाताने दंश केला. वास्तविक मुंबईतील ऊन इतके घातकी वळण घेत नाही व समुद्राचा शेजार लाभलेल्या मुंबईच्या हवेत आर्द्रता अधिक असल्याने उकाडा प्रचंड जाणवतो, परंतु विदर्भ किंवा मराठवाड्यासारखा उन्हाचा तडाखा जाणवत नाही. महाराष्ट्रभूषण पुरस्कार सोहळ्याच्या दिवशी मात्र मुंबईच्या उन्हाने कहर केला. उष्माघातामुळे अनेक श्रीसदस्यांना त्रास झाला. शेकडो श्रीसदस्यांना इस्पितळात उपचार घ्यावे लागले. नवी मुंबईच्या एमजीएम रुग्णालयात उष्माघातग्रस्तांची रीघ लागली होती. उष्माघातामुळे शरीराचे तापमान वाढते आणि शरीरातील पाणी कमी होते. याचा दुष्परिणाम मेंदूच्या कार्यावर होतो. तशाप्रकारचा त्रास होऊन किमान तेरा श्रीसदस्यांना आपला जीव गमवावा लागला. या प्रकारामुळे श्रीसंप्रदायावर शोककळा पसरली आहे, तसेच देशभरातील अनेक जण मनापासून हळहळले आहेत. तसे पाहता ज्येष्ठ निरुपणकार अप्पासाहेब धर्माधिकारी यांचा कुठलाही कार्यक्रम प्रचंड गर्दीचाच असतो. अनेक सेवाभावी कार्यक्रम त्यांनी लीलया राबवले आहेत. असे असतानाही ही दुर्घटना का घडली? 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' हा नेहमीच वादाच्या भोवऱ्यात का पडतो? यंदा आप्पासाहेब धर्माधिकारी यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर कुठलाही वाद झाला नव्हता कारण त्यांचे कार्यकर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व वादातीत राहिले आहे. १९४३ साली थोर समाजसेवक व ज्येष्ठ निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांनी श्रीसंप्रदायाचे रोपटे रोविले होते. अंधश्रद्धा निर्मूलन, बालसंस्कार, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण, रक्तदान अशा असंख्य क्षेत्रात धर्माधिकारी कुटुंबीय आणि त्यांच्या संप्रदायाने स्वत:ला निरपेक्षपणे वाहून घेतले. स्वर्गीय नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पश्चात अप्पासाहेबांनी त्यांचे कार्य पुढे चालू ठेवले. आता उष्माघाताच्या दुर्घटनेनंतर मात्र विरोधक अनेक प्रश्न विचारत आहेत. महाराष्ट्रभूषण सोहळा दिवसा का आयोजित केला, संध्याकाळी का नाही केला? केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सोयीसाठी लाखो श्रीसदस्यांना उन्हात का बसवण्यात आले? राज्य शासन आणि प्रशासनाने अशी संवेदनाशून्यता का दाखवली अशा प्रकारचे प्रश्न विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून विचारले जात आहेत. त्यांचा रोख अर्थातच शिंदे-फडणवीस सरकारवर आहे हे उघड आहे, परंतु एवढी दु:खद घटना घडलेली असताना त्यांचा राजकारणासाठी उपयोग करण्याच्या दुर्बुद्धीला काय म्हणावे? खरे तर हा दुर्धर प्रसंग एकट्या धर्माधिकारी कुटुंबावर आलेला नसून संपूर्ण महाराष्ट्रावरच ओढवला आहे. राजकारण करण्याची ही वेळ नव्हे एवढे भान तरी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी ठेवायलाच हवे.**



# वाढत्या तापमानात आरोग्य सांभाळा!



ग्लोबल वार्मिंगमुळे वातावरणात सतत बदल होत असले तरी कडाक्याची थंडी संपल्यानंतर उन्हाळा सुरु झाला आहे. उन्हाळ्यात त्वचाविकार, काविळ, टायफाईड, घशाचे आजार, गोवर तसेच उष्माघात असे आजार उद्भवतात. उन्हाळा सुरु झाल्यामुळे ऋतूतील झालेल्या बदलामुळे विविध प्रकारचे आजार उद्भवतात. यामध्ये प्रामुख्याने त्वचा विकार तसेच उष्माघाताचा समावेश आहे. उन्हाळ्यात आरोग्य सांभाळण्यासाठी प्रतिबंधक उपाय बरोबरच काही दक्षता आणि खाण्यापिण्यावर बंधने ठेवणे तेवढेच महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यामुळे साधारणतः सर्वत्र उष्णतेमुळे जाणवणारा दहाक परिणाम म्हणजे उष्माघात. यामध्ये शरीराचे तापमान उच्च पातळीवर जाते. योग्य ते उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता अधिक असते.



उन्हाळ्यात आरोग्य सांभाळण्यासाठी प्रतिबंधक उपायांबरोबरच काही दक्षता आणि खाण्यापिण्यावर बंधने ठेवणेही तितकेच महत्वाचे आहे. उन्हाळ्यामध्ये उष्माघाताचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर दिसतात. यात शरीराचे तापमान उच्च पातळीवर जाते. योग्य ते उपचार वेळेवर न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते.

शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते.

उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागतात. म्हणजे प्रमाणाबाहेर वाढलेले शारीरिक तापमान (१०४ डिग्री पेक्षा जास्त). घाम बाहेर पडत नाही त्यामुळे त्वचा गरम आणि कोरडी होते. घाम येण्याचे थांबते, नाडीची आणि श्वासाची गती वाढलेली असते, रक्तदाब सुरुवातीला वाढतो आणि नंतर कमी होतो, शरीरात ताठरता येते, हात आणि पायात आकडी (क्रांप्स) येतात, मानसिक बदल होतो, चिडचिड होते, भ्रम होतो आणि कोमा म्हणजेच बेशुद्धवस्था येते आणि मृत्यू सुद्धा ओढवू शकतो. हे असे क्रमाक्रमाने होते, बेशुद्धवस्था हा वयस्कांमध्ये उष्माघातचा पहिला संकेत असू शकतो.

नागरिकांनी उन्हाळ्यात स्वत:ची व कुटुंबाची काळजी कशी घ्यावी यासाठी शासकीय यंत्रणांमार्फत मार्गदर्शक सुचना प्रसिध्द केल्या जात आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.

**-विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई**



### काय करावे

तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/ टोपी, बूट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करण्यात यावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचा प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस (ORS), घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करण्यात यावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत.असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्य प्रकाशाच्या थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करण्यात यावे. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना अधूनमधून विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर, कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.

### काय करू नये

लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# शेतकऱ्यांसाठी लॉन्च झाला किसान जीपीटी

गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात ओपनआयने चॅट जीपीटी हा चॅटबॉट लॉन्च केला आहे. त्यावर अनेक प्रकारचे संशोधन अजून सुरू आहे. त्याच्याशी स्पर्धा करण्यासाठी अनेक कंपन्यांनीदेखील आपले एआय चॅटबॉट लॉन्च केले आहेत. काही जण त्यावर काम करत आहेत. काही कालावधीपूर्वी गीता जीपीटी नावाचे एक टूल लॉन्च झाले होते. ज्यामध्ये लोकांना भगवद्गीतेवर आधारित प्रश्नांची उत्तरे मिळतात. आता असाच एक किसान जीपीटी नावाचा चॅटबॉट लॉन्च झाला आहे. हा चॅटबॉट शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यास मदत करणार आहे.




काय आहे गीता जीपीटी : गुगलच्या एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने भगवद्गीतेवर एक गीता जीपीटी एआय चॅटबॉट विकसित केला आहे. गीता चॅटबॉटच्या मदतीने वापरकर्ते आपल्या दैनंदिन समस्यांबाबत गीतेचा सल्ला घेऊ शकणार आहेत. म्हणजेच वापरकर्ते या प्लॅटफॉर्मवर जे काही प्रश्न विचारतील त्याचे उत्तर एआय चॅटबॉट भगवद्गीतेच्या मदतीने देणार आहे.

काय आहे किसान जीपीटी : किसान जीपीटी एक एआय चॅटबॉट आहे जो चॅट जीपीटी ३.५वर आधारित आहे. या चॅटबॉटद्वारे शेतकरी शेतीशी संबंधित कोणत्याही समस्येवर उपाय मिळवू शकतात. प्रतिक देसाई यांनी १५ मार्च रोजी चॅट जीपीटी लाँच केले. या चॅटबॉटमध्ये प्रवेश करण्यासाठी, तुम्हाला https://kissangpt.com/ वर जावे लागेल. ही वेबसाइट वापरण्यासाठी अतिशय सोपी आहे. तुम्ही वेबसाइटवर जाताच तुम्हाला १४ भाषांचे पर्याय मिळतील, त्यापैकी तुम्हाला एक भाषा निवडावी लागेल. त्यानंतर तुम्ही त्या भाषेत तुमची समस्या चॅटबॉटला सांगू शकणार आहात. समस्या ऐकल्यावर, चॅटबॉट तुम्हाला काही सेकंदात त्याचे उत्तर देईल. किसान जीपीटीमध्ये बगची समस्या असू शकते कारण त्यावर अजून काम सुरू आहे. कधीकधी ते तुम्हाला चुकीची उत्तरे किंवा अपूर्ण उत्तरेदेखील देऊ शकते. किसान जीपीटी केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही तर शाळकरी मुले, संशोधक किंवा इतर कोणीही त्याचा वापर करू शकतात. ३१ मार्च रोजी अपडेटेड ट्विटमध्ये प्रतीक देसाई यांनी सांगितले की, लवकरच किसान जीपीटीला सरकार आणि कृषी संस्थेशी जोडले जाईल. यासोबतच एक ॲपदेखील तयार करण्यात येत आहे जेणेकरून लोकांना या ॲपच्या माध्यमातून त्याचा वापर करता येईल.

# 'बाल पेशवा' सवाई माधवराव पेशवा



## निमित्त

सवाई माधवराव पेशवा यांचा जन्म १८ एप्रिल १७७४मध्ये पुरंदर किल्ल्यावर झाला. मराठेशाहीच्या पडत्या काळातील बाल पेशवा म्हणून ते ओळखले जात. नारायणराव व गंगाबाई यांचा हा मुलगा. त्यांचे बालपण पुरंदर किल्ल्यावर लष्करी बंदोबस्तात गेले. त्यामुळे राज्यकर्त्यास योग्य असे शिक्षण त्याला मिळाले नाही. त्यांना वाढविण्याची जबाबदारी कारभाऱ्यांवर म्हणजे नाना फडणीसांवर आली. साहजिकच लिहिणे-वाचणे, हिशेब ठेवणे, घोड्यावर बसणे, कसरत करणे याचे जुजबी शिक्षण त्यांना मिळाले, पण शहाण्यासुरत्या मुत्सद्दी माणसांच्या गाठीभेठी, राजकारण्याच्या वाटाघाटी, लष्करी मोहीम यांपासून पेशवा वंचित राहिले. त्यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षी आई गंगाबाई मरण पावली. त्यामुळे त्यास खास मायेचे कोणीच उरले नाही.

कर्तबगार चुलता थोरला माधवराव यापेक्षा मोठी कामगिरी याच्या हातून पार पडेल या भावनेने त्यास 'सवाई माधवराव' हे नाव प्राप्त झाले. जन्मानंतर ४० दिवसांनी २८ मे १७७४ रोजी त्यास साताऱ्याच्या छत्रपतींकडून पेशवाईची वस्त्रे मिळाली. काही दगाफटका होऊ नये म्हणून माधवरावास पुरंदर किल्ल्यावर ठेवण्यात आले. पाच वर्षानंतरच पुरंदरची थंड हवा सोसेना म्हणून पेशव्यासह सर्व मंडळी पुण्यास आली. १० फेब्रुवारी १७८३ रोजी थत्ते कुटुंबातील रमाबाई यांच्याशी त्याचे थाटाने पहिले लग्न करण्यात आले. यानंतर गणेश वि. गोखले यांच्या यशोदाबाई या मुलीशी दुसरे लग्न झाले.

सवाई माधवरावच्या वेळी पहिले इंग्रज-मराठे युद्ध (१७७४-८२), टिपूशी युद्ध (१७८६-८७), टिपूविरुद्ध केलेली श्रीरंगपट्टणची इंग्रज निजामासह संयुक्त मोहीम (१७९०-९२), खर्ड्याचे युद्ध (१७९५), पाटीलबाबा शिंदे यांनी मोगल बादशाही ताब्यात घेऊन उत्तरेकडील राजेरजवाडे आणि मुस्लिम संस्थानिकांशी केलेली युध्दे (१७८४-१७९१) असे अनेक युद्धप्रसंग घडले आणि मराठ्यांनी अखिल हिंदुस्थानात पुन्हा नावलौकिक मिळविला. पेशव्यांच्या दरबारात आलेल्या चार्ल्स मॅलेट या इंग्रज वकिलाने सवाई माधवरावविषयी अनेक तपशीलवार गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. त्यावरून त्यांची शरीरयष्टी, स्वभाव, वर्तन यावर प्रकाश पडतो.

महादजी शिंदे १७९२मध्ये महाराष्ट्रात आले. या मुक्कामात त्यांनी माधवरावास मानमरातब, मेजवान्या, पानसुपाऱ्या केल्या. स्वारी, शिकारीला बरोबर घेतले व धनीपणाचा हक्क बजाविण्याविषयी सांगितले. तेव्हापासून पेशव्यास परिस्थितीचा विशेषतः परावलंबित्वाचा उलगडा झाला. खर्ड्याच्या मोहिमेवरून पेशवा १७९५मध्ये परत आला. (दुसरा) बाजीराव रघुनाथ जुन्नर येथे कैदेत होता. त्याने पेशव्याशी गुप्तपणे पत्रव्यवहार सुरू केला होता. नाना फडणीस यांनी तो पत्रव्यवहार पकडून पेशव्यास शरमिंदे केले. कारभाऱ्याने आपल्याला कसलीही मोकळीक देऊ नये याची त्यास खंत वाटू लागली. त्यात तापाने तो आजारी पडला. दसऱ्याचा समारंभ कसाबसा पार पडला. सवाई माधवराव २५ ऑक्टोबर १७९५ रोजी तापाच्या भरात त्याने शनिवारवाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरुन खाली कारंज्यावर उडी टाकली व २७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी त्यांचा मृत्यू झाला. सवाई माधवराव स्वतः कर्तबगार वा सुज्ञ नव्हते तरी त्यांच्या अस्तित्वाने मराठ्यांची सत्ता एकवटून राहिली होती. त्याच्या मृत्यूनंतर पेशवाईत रस्सीखेच सुरू झाली व विघटनवादी प्रवृत्तीला ऊत आला. त्यानंतर २०-२२ वर्षांत इंग्रजांनी मराठ्यांची सत्ता नष्ट केली.

**-साभार विकासपीडिया**

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : सायंकाळी सूर्य अस्ताला जाताना ढगांची दाटी होते. त्यांची समुद्रकिनारी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

# उष्माघातापासून 'असा' करा स्वत:चा बचाव!

हवामानाचे सातत्याने बदलते स्वरूप पाहता आरोग्यतज्ज्ञ लोकांना उष्णतेपासून काळजी घेण्याचा सल्ला देत आहेत. वृद्धांपासून ते लहान मुलांपर्यंत दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला आरोग्य तज्ञांनी दिला आहे. उष्माघात झाल्यास काय करावे आणि उष्माघातापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी काय उपाय कराल हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.



* **पुरेसे पाणी प्या** : सरासरी दोन लिटर पाणी दररोज शरीरात जाणे गरजेचे असते. बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवा. साध्या पाण्याव्यतिरिक्त, नारळाचे पाणी, भाज्या आणि फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही.

* **योग्य सन प्रोटेक्शन वापरा** : एसपीएफ ३० किंवा त्याहून अधिक असलेले, यूव्हीए आणि यूव्हीबी किरणांपासून सुरक्षित ठेवणारे सनस्क्रीन लोशन वापरा. घरातून बाहेर पडण्यापूर्वी किमान १५ मिनीटे ते सर्व उघड्या त्वचेवर ते व्यवस्थित लावा. रुंद जाड टोपी घाला आणि जेव्हा शक्य असेल तेव्हा गॉगलचा वापर करा.

* **मद्यपान टाळा** : उन्हाळ्याच्या दिवसात अल्कोहोल किंवा सोडा यांचे सेवन केल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते व उष्माघात किंवा डिहायड्रेशनची शक्यता दुणावते. मद्यपानाऐवजी अन्य थंड पेये पिण्याचा पर्याय निवडा.

* **दुपारी उन्हात जाणे टाळा** : दुपारी १२ ते ३ ही वेळ सर्वाधिक उकाड्याची असते. त्यामुळे या वेळेत बाहेर न पडता घरात किंवा अन्य सावलीच्या ठिकाणी राहून आराम करा. या वेळेत तापमान जास्त असल्याने तुमच्या शरीरातली सर्व ऊर्जा काही मिनीटांतच खेचली जाते. या वेळेत बाहेर काम करणे टाळावे.

### उष्माघात झाल्यास काय कराल?

उष्माघात झाल्यास शरीरातील जास्त झालेली उष्णता लवकरात लवकर बाहेर काढणे व रक्ताभिसरण खेळते ठेवणे हाच प्रथमोपचार आहे. सर्वप्रथम व्यक्तीला शक्य असल्यास वातानुकूलित जागेत अन्यथा सावलीत वा थंड ठिकाणी हलवावे आणि शरीरावरील जास्तीचे कपडे काढून टाकावेत. त्यामुळे शरीरातील उष्ण तापमान कमी होण्यास मदत होते, तसेच त्या व्यक्तीचे शरीर ओल्या कापडाने पुसून घ्यावे.

# एक्स्प्रेस वेवर ॲसिडने भरलेला टँकर कलंडला

## ■ बोरघाटात आडोशीजवळ मोठी दुर्घटना टळली ■ वाहतूक पोलिसांची धावपळ

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर नायट्रिक ॲसिडने भरलेला टँकर अनियंत्रित होऊन लेनच्या बाजूला कलंडल्याची घटना सोमवारी घडली.

पुण्याच्या दिशेने निघालेला टँकर बोरघाटात आडोशी दरम्यान टँकरवरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे टँकर उलट्या दिशेने मागे गेला. अनियंत्रित झालेला टँकर पुणे लेनवरून मुंबई लेन ओलांडून बाजूला जावून कलंडला. टँकर फ्लँजमधून गळती सुरू झाल्याने संभाव्य दुर्घटना



टाळण्यासाठी बोरघाट वाहतूक पोलीस मदत केंद्र सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले, खोपोली पोलीस ठाण्याचे लहाने, अपघात ग्रस्त मदत पथकाचे गुरुनाथ साठेलकर, रसायन तज्ञ धनंजय गीध घटनास्थळी तातडीने पोहचले.

टँकरमधून सुरू असलेली नायट्रिक ॲसिडची गळती थांबवण्यात धनंजय गिध याना यश आले. टँकर पूर्ण क्षमतेने ॲसिडने भरलेला असल्यामुळे क्रेन बोलून टँकर लेनवर आणण्यात आला. टँकर कलंडला त्या ठिकाणापासून जवळच मीटिंग लिंकचे काम सुरू आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात गळती झाली असती तर दुर्घटनेची तीव्रता वाढली असती.

**टँकर क्रेनने बाहेर काढल्यानंतर सुस्थितीत असल्यास पुढे पाठवण्यात येईल अन्यथा त्या टँकरमधील रसायन दुसऱ्या टँकरमध्ये हलवण्याची व्यवस्था करण्यात येते, असा पर्याय आहे. सुदैवाने पुणे लेनवरून अनियंत्रित टँकर मुंबईला ओलांडून येताना अपघात घडला नाही. टँकर चालक सुखरुप असून कोणालाही इजा झालेली नाही.**

**–योगेश भोसले**, सहाय्यक पोलीस निरीक्षक, बोरघाट पोलीस मदत केंद्र

# खांब विभागातील माजी सरपंचासह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पेण : प्रतिनिधी**

पेण-पाली रोहा मतदारसंघातील आंबेवाडी जिल्हा परिषद गणातील खांब विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी सरपंच परशुराम धामणसे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष महेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आमदार रविशेठ पाटील यांच्या कार्यप्रणालीवर व युवानेते वैकुंठ पाटील यांच्यावर विश्वास ठेवत वैकुंठ निवासस्थानी भारतीय जनता पक्षात जाहिर प्रवेश केला.

यावेळी बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, पेण, पाली, सुधागड, रोहा मतदारसंघात विकासाची गंगा भारतीय जनता पक्षात आणू शकतो त्यामुळेच तुम्ही जो विश्वास भारतीय जनता पक्षावर टाकला आहे तो सार्थ ठरवण्यात येईल. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, रोहा तालुका मिडिया कल्पेश माने, जेष्ठ नेते विष्णू मोरे जे. डी पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी माजी सरपंच परशुराम धामणसे, शांताराम माने, दिलिप पार्टे, विनोद गोठम, ऋतिक डोकरे, संदेश गोठम यांच्यासह कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये जाहिर प्रवेश केला असल्याचे महेश ठाकूर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सर्वांचे भाजपात स्वागत करुन खांब परिसरात विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे सांगितले.



# चौक येथे महिलेच्या हातातील बांगड्या घेऊन आरोपी पसार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक बाजारपेठेमधून एका दुकानातून आरोपीने हातचलाखी करून महिलेच्या हातातील तिन बांगड्या घेऊन पसार झाल्याने अशा अनोळखी व्यक्तींपासून सावध रहावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

चौकचे व्यापारी छगन ओसवाल व आई बदामीबाई पुनमचंद ओसवाल यांचे तीन मजली घर असून तळमजल्यावर दुकानाचे गाळे आहेत. यात महावीर फर्निचर दुकान ते स्वतः चालवतात. बाजूला आयसीआयसीआयचे एटीएम व इस्त्रीचे दुकान आहे. ते भाड्याने दिले आहे. बदामीबाई सकाळी दुकानात असताना दुकानासमोर एका मोटारसायकलवरून दोघे आले. मोटारसायकलवरील मागचा माणूस दुकानात आला. त्याने एक वाटी खरेदी केली व त्याचे पैसे दिले. त्यानंतर त्याने मी देवदर्शनाला जात असून आपली हाताची बोटे वाटीत फिरवा असे बदामिबाई यांना सांगून त्यांना बोलण्यात गुंतून ठेऊन त्यांच्या हातातील सोन्याच्या तीन बांगड्या वाटीत ठेवण्यास सांगितले.

दुसऱ्या हातातील बांगड्या काढण्यास सांगितले पण त्या निघाल्या नाहीत, पण तीन बांगड्या वाटीत ठेऊन ती पिशवीत ठेवली, हे कळण्यापूर्वीच त्याने तेथून पोबारा केला. बदामीबाई यांच्या लक्षात येताच त्यांनी मुलगा, पुतण्या व शेजाऱ्यांना घटना सांगितली. त्वरित चौकचे सपोनी युवराज सुर्यवंशी यांनी तपास कामास सुरूवात केली आहे. तसा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

**TIPL PAY & PARK KALAMBOLI (5.NO.PARKING KALAMBOLI)** आणि **TIPL PAY & PARK DRONAGIRI (THAKUR PARKING)** मध्ये उभ्या केलेल्या वाहनांच्या मालकांनी जवळ जवळ दोन वर्षा पेक्षा जास्त कालावधीमध्ये न नेलेल्या वाहनांची विक्री नोटीस.

**(A)TIPL PAY & PARK KALAMBOLI (5.NO. PARKING KALAMBOLI).**

**(B)TIPL PAY & PARK DRONAGIRI.**

**(A) TIPL PAY & PARK KALAMBOLI (5 NO. PARKING KALAMBOLI)**

| SR NO | Vehicle Type | Token No. | Vehicle No. | In Date / Time | LOCATION | DATE 31/05/2023 UNPAID BALANCE |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | HORSE | 1219319 | MH06AQ2782 | 12/02/2018 14:27:08 | IN GATE TO SHOPPER | 2,90,100/- |
| 2 | HORSE | 1321631 | MH43U9175RTO | 17/11/2018 17:17:41 | IN GATE TO SHOPPER | 2,48,400/- |
| 3 | HORSE | 1325831 | MH04CA5680RTO | 29/11/2018 12:58:31 | G-1,L-1 | 2,46,600/- |
| 4 | HORSE | 1332829 | NL02N2051 | 18/12/2018 13:49:07 | IN GATE TO SHOPPER | 2,43,750/- |
| 5 | DUMPER | 1340474 | BHJP069871RTO | 7/01/2019 18:27:41 | G-1,L-1 | 3,51,495/- |
| 6 | HORSE WITH TROLLY. | 1346677 | MH04FJ8459 | 23/01/2019 16:47:38 | IN GATE TO SHOPPER | 3,47,991/- |
| 7 | TRUCK | 1349392 | MH04FP6639RTO | 30/01/2019 19:10:01 | G-1,L-1 | 2,37,300/- |
| 8 | HORSE | 1361935 | MH04EL0968 | 02/03/2019 09:29:04 | IN GATE TO SHOPPER | 2,32,650/- |
| 9 | TRUCK | 1379939 | MH46F3853 | 16/04/2019 13:45:20 | IN GATE TO SHOPPER | 2,25,900/- |
| 10 | HORSE | 1396628 | MH46H4496 | 05/06/2019 16:13:35 | IN GATE TO SHOPPER | 2,18,400/- |
| 11 | TROLLY | 1400399 | MH04EB9407 | 18/06/2019 10:52:41 | G-1,L-2 | 3,16,017/- |
| 12 | HORSE | 1438744 | MB1TLCHD2KEFD4742 | 08/10/2019 20:30:54 | IN GATE TO SHOPPER | 1,99,650/- |
| 13 | HORSE | 1443785 | MH46BF2553 | 23/10/2019 16:47:26 | IN GATE TO SHOPPER | 1,97,400/- |
| 14 | HORSE WITH TANKER | 1486758 | MH04FU6579 | 09/03/2020 12:37:51 | G-1,L-2 | 2,57,982/- |
| 15 | HORSE WITH TANKER | 1488051 | MH04JK2855 | 13/03/2020 07:49:28 | G-1,L-1 | 2,57,106/- |
| | | | | | TOTAL PARKING | 38,70,741/- |

**(B) TIPL PAY & PARK DRONAGIRI ( DRONAGIRI PARKING. )**

| SR NO | Vehicle Type | Token No. | Vehicle No. | In Date / Time | LOCATION | DATE 31/05/2023 UNPAID BALANCE |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | LCV/2AXLE | 252366 | MH43U45 | 13/02/2018 21:37:44 | LINE NO.8 | 2,45,491/- |
| 2 | HORSE WITH TAILER | 332711 | MH43U5137RTO | 09/10/2018 13:09:50 | LINE NO.8 | 4,10,190/- |
| 3 | LCV/2AXLE | 350276 | JH01BV4081 | 01/12/2018 10:22:04 | LINE NO.8 | 2,08,534/- |
| 4 | HORSE WITH TAILER | 398948 | MH06AQ7533 | 17/04/2019 13:01:21 | LINE NO.8 | 3,64,210/- |
| 5 | HORSE WITH TAILER | 467979 | MH04FJ7818 | 19/10/2019 15:32:46 | LINE NO.8 | 3,19,440/- |
| 6 | LCV/2AXLE | 477216 | MH43Y9188 | 14/11/2019 18:30:23 | LINE NO.8 | 1,64,338/- |
| 7 | LCV/2AXLE | 511546 | MH43F2195RTO | 13/02/2020 11:19:54 | LINE NO.8 | 1,52,781/- |
| 8 | LCV/2AXLE | 511550 | MH43C8837RTO | 13/02/2020 11:32:05 | LINE NO.8 | 1,52,781/- |
| | | | | | TOTAL PARKING | 20,17,765/- |

उपरोक्त निर्देशित यादी मधील वाहनांच्या मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स /फाईनान्सर्स /हितसंबंध असणा-या सर्वांना आर टी ओ कडून व अन्य माध्यमातून पत्ते उपलब्धते नुसार पत्र व्यवहारने संबंधित वाहने वाहनतळाचे भाडे भरणा करुन घेवून जाण्याचे कळविले आहे. परंतू या विनंती प्रमाणे या निर्देशित वाहनांचे मालक/चालक/फायनान्सर/हितसंबंधितांनी योग्य प्रतिसाद दिलेला नाही, या कारणाने या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, वरील तक्त्यामधील निर्देशित वाहने त्यांचे समोर दाखविलेल्या तारखेपासून आमच्या वाहानतळांमध्ये भंगार आवस्थेत उभी करुन ठेवलेली आहेत. संदर्भीय तारखेपासून ही वाहने उभी केल्यानंतर आजतागायत कोणात्याही प्रकारे या वाहनांचे पार्कींग भाडे, भरणा करण्यात आलेले नाही. संदर्भीय वाहने उभी केल्यापासून दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंत वरील तक्त्यात दाखविल्या प्रमाणे प्रत्येक वाहनांचे पार्कींग भाडे थकीत आहे. सदरहू वाहनांचे भाडे ते प्रत्येक वाहन बाहेर नेई पर्यंत प्रत्येक दिवसाला वाहनतळांच्या नियमाप्रमाणे वाढत आहे.

तरी सर्व सबंधितांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दी पासून १५ दिवसांचे आत आमच्या खालील निर्देशित पत्त्यावर पार्कींगची पावती /कार्ड घेऊन संपर्क साधावा व पार्कींगचे थकित भाडे भरणा करावे आणी वरील निर्देशित वाहनांच्या मालक/चालक/ ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हितसंबंध असणारांनी त्यांचे संबंधित वाहन बाहेर घेऊन जावे.

वरील प्रमाणे दिलेल्या मुदत कालावधीमध्ये संदर्भीय वाहनांचे मालक/चालक/ट्रान्सपोर्टर्स/फाईनान्सर्स/हितसंबंधी यांनी वाहनांचे थकित भाडे भरणा न केल्यास त्यानंतर जाहीरात प्रसिध्दीपासून पुढील सात दिवसामध्ये संदर्भीय वाहनांची भंगारात विक्री करुन पार्कींगचे थकित भाडे वसूल केले जाईल व त्यानंतर कोणत्याही प्रकारे संदर्भीय वाहनांचे मालक/चालक/ ट्रान्सपोर्टर्स /फाईनान्सर्स/ हितसंबंधी यांचे हक्क व अधिकार विचारात घेतले जाणार नाहीत. कोणत्याही नुकसानीच्या तक्रारीस **TIPL** व्यवस्थापन जबाबदार राहणार नाहीत याची नोदं घ्यावी.

वरील तक्त्यातील संदर्भीय वाहनांचे भंगार खरेदी बाबत याच नोटीसीच्या संदर्भाने भंगार खरेदीदारांनी त्यांचे सिलबंद पाकीटात भंगार वाहनांच्या खरेदीचे दर, खालील सही करणारांस नोटीसीच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसात सादर करावेत. जो निर्देशित वेळे मध्ये या वाहनांचे थकित पार्कींग भाडे एकूण रक्कम **58,88,506** /- (अठ्ठावन्न लाख अठ्ठयाऐंशी हजार पाचशे सहा रुपये मात्र**. )** भंगार खरेदीची सर्वात जास्त रक्कमेची बोली वाहननिहाय देवून एकरक्कमी रक्कम देण्याचे दर सिलबंद पाकीटात देईल त्यांस वाहनांचा ताबा देण्यात येईल.संदर्भीय वाहनांचा भंगार म्हणून ताबा घेतल्यानंतर या वाहनांची सर्व जबाबदारी भंगार खरेदीदारांची राहील व तद्पश्चात या वाहनांचे अनुषंगाने कोणत्याही परीणामास **TIPL** जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

पनवेल
दिनांक: १८/०४/२०२३

**व्यवस्थापक,**
**TIPL PAY & PARK DRONAGIRI.**
**नोटीस प्रसिद्धी करणारे**

**व्यवस्थापक,**
**TIPL PAY & PARK KALAMBOLI .**
**नोटीस प्रसिद्धी करणारे.**

## ग्रामपंचायत आकुर्ली
ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र.०५/ग्रा.पं./आस्था २०२३
ग्रामपंचायत आकुर्ली
दिनांक १७/०४/२०२३

**जाहीर निविदा**

याव्दारे जाहीर करण्यात येते कि खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहीतील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असुन त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत (वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))

| अ.क्र | भाग क्र. | स.न / प्रॉ. नं/फा. प्लॉट/सदनिका/गाळा नं | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/४०२ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | राहुल काशिनाथ जन्नेकर<br>पुजा राहुल जन्नेकर |
| २ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१२०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | जयप्रकाश पारसनाथ सिंग<br>किरण जयप्रकाश सिंग |
| ३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/२१०५ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | संतोष श्रावण कोळी<br>प्रियंका संतोष कोळी |
| ४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/२२०५ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | रमेश बाबू सीलम<br>स्वरूपा राणी सीलम,<br>प्रत्युशा सीलम |
| ५ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/२५०५ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | अशोक ज्ञानमल जैन,<br>निर्मला अशोक जैन,<br>गौतमचंद अशोककुमार जैन |
| ६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/१३०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | जॉय दास,<br>नबनीता दास |
| ७ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/२२०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | मयुर दिलीप पाटील |
| ८ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/२५०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | सुविथ हेगडे |
| ९ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२०१ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | अभिनव गुप्ता |
| १० | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/१२०१ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | गिता सुभाष खेतले,<br>सुभाष आबाजी खेतले,<br>प्रतिक सुभाष खेतले,<br>प्रशांत सुभाष खेतले |
| ११ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/१७०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | मितेश अनिलकुमार पाटील,<br>अनिलकुमार भास्कर पाटील,<br>शैलजा अनिलकुमार पाटील |
| १२ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/१८०१ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | गौरिक भौमिक<br>अंजली गौतम भौमिक |
| १३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२५०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | गुलजित सिंग चोप्रा<br>जोगिंदर सिंग चोप्रा |
| १४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२८०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | रश्मी |
| १५ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२९०७ | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो.प्रा. विनय एस अग्रवाल | विश्वनाथ देशपांडे<br>विजयलक्ष्मी देशपांडे |
| १६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/२००४ | संदिप श्रीकांत शेवाळे, श्रीकांत रघुनाथ शेवाळे | संतोष विश्वनाथ वाणी<br>संकेत संतोष वाणी |
| १७ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२००३ | शेख बद्रुद्दीन, शेख फरजाना बद्रुद्दीन | संतोष साहेबराव कोळी<br>वैशाली साहेबराव कोळी |
| १८ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/६०७ | डॉ. मुकेश चंद्र अगरवाल | चिराग प्रकाश सिंघवी<br>सोनल चिराग सिंघवी |
| १९ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/६०६ | मोहिते मुकेश अगरवाल | पुजा आचार्य |
| २० | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१००३ | राज गोविंद बोरुळकर | शमशाद हुसैन<br>शाहीन बानो |
| २१ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१२०२ | अमिता बाळासाहेब जगदाळे | निरजकुमार सिंग<br>सुधा निरजकुमार सिंग |
| २२ | | फ्युचर हील आकुर्ली ४१७/A/४०२ | श्रुती सुरेश सुर्वे | सत्तार गन्नी आतार<br>तनुजा आदम तांबोळी |
| २३ | | पनवेल पॅराडाईज आकुली ३६०/C/००१ | लकपती बानोत | सचिन शिवराम भोसले<br>स्वरा सचिन भोसले |
| २४ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/N/२०१ | मे. अशियान रीअल्टी तर्फे भागीदार जिगर के मेहता | संजय नंदकिशोर जाधव |
| २५ | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ब/D/१०२ | राजन अशोक बेलोसकर | प्रफुल सुनिल दाभोळकर<br>सुवर्णा सुनिल दाभोळकर |
| २६ | | श्री राम अव्हेन्यू आकुर्ली ४१५/१०९ | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | अतुल सिध्दार्थ जाधव<br>मयुरी अतुल जाधव |
| २७ | | श्री राम अव्हेन्यू आकुर्ली ४१५/३०३ | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | तेजेश पांडुरंग धुरे<br>तनिष्का तेजेश धुरे |
| २८ | | श्री राम अव्हेन्यू आकुर्ली ४१५/३०८ | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | संदेश नामदेव शिंदे<br>सायजी संदेश शिंदे |
| २९ | | श्री राम अव्हेन्यू आकुर्ली ४१५/३०१ | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | अमुता अनिल परब<br>सायजी संदेश शिंदे<br>गौरी अनिल परब |
| ३० | | बेलमॅक रिव्हरसाईट आकुर्ली ४०९/A/१०२ | कल्पेश प्रविणकुमार मेहता<br>विजय शांताराम भुवड | राधिका घनश्याम दैमीवाल<br>घनश्याम शशिकांत दैमीवाल |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असुन या बाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदत करणेत आलेनंतर प्राप्त होणा-या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुबंई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२(१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल यांची कुपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(जयेंद्र घनशाम म्हात्रे)**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. भारती सचिन पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले मौजे विचुंबे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड मधील मिळकतीचे विद्यमान मालक **१ श्री बाबु गणेश गायकवाड २. सौ. जयश्री दिपक निकालजी, ३ श्रीमती रंजना गणेश गायकवाड** यांचे हिश्श्याची मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकती असून सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीचे करारनामा करण्याचे आहेत. परिशिष्टात वर्णनात नमुद केलेल्या मिळकतीचे करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – विचुंबे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| ३४ | | ०-२५-३०<br>पो.ख. ०-०२-०० | | २.५६ |
| | | एकूण क्षेत्र ०-२७-३० | पैकी ०.०७.० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणताही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार ,ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट समझोता करार, साठेकरार, विक्रीविनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी वारसाहक्क,ट्रस्ट न्यास भाडेपटटा सबलिज, अंडरलिज, वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ चौदा दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात याप्रमाणे मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास ,सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १७/०४ / २०२३
ठिकाण पनवेल

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
बी. ए. एलएल. बी.
**पत्ता :** ऑफिस नं २०१
दुसरा मजला साई आर्केड. जी. पी. पारसिक बँकेवरती लाईफ लाईन हॉस्पीटल जवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर, पनवेल जि. रायगड ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

## पनवेल महानगरपालिका, पनवेल विद्युत विभाग
## जाहीर सुचना

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील विविध विद्युत विषयक कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधित Manufacturer/Dealer/Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/विद्युत/२२२३/प्र.क्र.०१/४६०/२०२३
दिनांक- १७/०४/२०२३

**सही/-**
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, १) रोहिंजन उर्फ रोहिंटन रूसीकामा व २) कवाल मोहनसिंग अहलुवआलिया उर्फ अहलुवालीया, यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील, मालकी हक्कात असलेली त्यांचे कायदेशीर हक्काची खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांना त्यांचेकडून खरेदी करणेकरीता आमचे अशिलांची बोलणी चालू आहे. सदरहू जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कर्नाळा, तहसिल पनवेल, जिल्हा रायगड येथील**

| भूमापन क्र. | भूमापन क्र. चा उपविभाग | क्षेत्र लागवड योग्य हे.आर.चौ.मी. | क्षेत्र पो. खराबा हे.आर.चौ.मी. | क्षेत्र एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १६३ | १/१६ | ०-४५-०० | ०-००-०० | ०-४५-०० | ०.७५ |

वरील वर्णनाच्या जमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीनीसंदर्भात आमच्या अशीलांनी सदर जमीनीचे जमीन मालक यांचेसोबत नोटीसीतील नमूद मुदतीत पुर्ण केलेला व्यवहार हा निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०४/२०२३

**सही/-**
**ॲड. अतुल तुकाराम भोपी**
**कार्यालय :-** बी/८, माणेक नगर को-ऑप. हौ. सोसायटी, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७

## निवडक

### ब्रश स्ट्रोक्स चित्रकला प्रदर्शन

**उरण** : येथील सचिन पेडणेकर, निखिल कांबळे, मोनाली खातळे, निलेश पावसकर या कलाकारांनी एकत्र येत मुंबईमधील नेहरू सेंटर आर्ट गॅलरी, ॲनी बेसन्ट रोड, वरळी येथे १८ ते २४ एप्रिलदरम्यान ब्रश स्ट्रोक कला प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री विणा जामकर व प्रसिद्ध चित्रकार रूपेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या चित्रकला प्रदर्शनात प्रतिभावंत कलाकार सचिन पेडणेकर, निलेश पावसकर, निखिल कांबळे, मोनाली खातळे यांच्या चित्रांचा समावेश आहे. नागरिकांनी या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तळोजात चार मोबाईलची चोरी

**पनवेल** : तळोजा येथील घोटगाव येथे सुरू असलेल्या इमारती बांधकामाच्या दुसऱ्या मजल्यावरील रुममध्ये ठेवलेले चार मोबाईल अज्ञाताने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घोटगाव येथे बांधकाम सुरू असलेल्या अरिहंत अनायका बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरील खिडक्या नसलेल्या रुममध्ये ठेवलेले सॅमसंग ए३३, विवो टी१, सॅमसंग ए ०३ व टेको शार्क कंपनीचा मोबाईल असे चार मोबाईल अज्ञाताने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### पनवेल शहरातून तरुणी बेपत्ता

**पनवेल** : मॉलला फिरायला जाते असे सांगून राहत्या घरातून बाहेर निघालेली तरुणी बेपत्ता झाल्याची घटना पनवेल शहरातील साईनगर येथे घडली आहे. या तरुणीचे वय १८ वर्षे असून वर्ण गोरा, बांधा सडपातळ, उंची साडेचार फुट, चेहरा गोल, केस काळे आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस दूरध्वनी (क्र.०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार तुषार बोरसे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बालवैज्ञानिक स्पर्धेत परमचे यश

**नवी मुंबई** : सीवूड्स सेक्टर ५० जुने येथे राहणारा व पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इ. नववीमध्ये शिकणारा परम भाईवाल याने डॉ. होमी बाबा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले आहे. त्याने लिविंग इन हार्मोनि वुईथ नेचर यूसिंग आयओटी या भिंतीआतील पाणी गळती या विषयाचे संशोधन करून पाण्याची बचत करणे याबाबत प्रयोग सादर केला. त्याबद्दल परम भाईवाल याचे भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी अभिनंदन केले.

# वाशीत वाहतूक नियमनासाठी जंक्शन बॉक्स

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात अंमलबजावणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा मध्यवर्ती मुख्य चौक असून येथे वाहतुकीची नेहमी वर्दळ असते. या वाहतुकीचे नियमन करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना वाहतूक पोलीस विभागाचे अभिप्राय घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येत असतात. अशाच प्रकारची 'जंक्शन बॉक्स' ही एक अभिनव संकल्पना वाहतूक नियमनाच्या दृष्टीने वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राबविण्यात आलेली आहे.



जंक्शन बॉक्सद्वारे वाहतुकीचा प्रवाह सुयोग्य रितीने नियंत्रित होणार असून सहसा वाहनांची वर्दळ असलेले व्यस्त चौक, क्रॉस रोड्स, टी-जंक्शन्स अशा ठिकाणी ते बसविले जातात. ज्या ठिकाणी वाहतूक नियंत्रण करणाऱ्या ट्रॅफिक सिग्नलसारख्या नियंत्रण व्यवस्था उपलब्ध असूनही वाहतूक सुरळीत राहत नाही व स्थिर वाहने अडथळा निर्माण करतात, त्या ठिकाणी बॉक्स जंक्शनचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो.

जंक्शन बॉक्समध्ये वाहनांना थांबण्यास प्रतिबंध असल्याने जंक्शन नेहमी मोकळे राहतात आणि वाहतूक सुरळीत होण्यास मदत होते. जंक्शन बॉक्सबाबत कोड ऑफ प्रॅक्टीस रोड मार्किंग अंतर्गत नियमाची तरतूद आहे. प्रायोगिक तत्त्वावर वाशी येथील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराज चौकात जंक्शन बॉक्स तयार केला असून तेथील उपयोगिता लक्षात घेऊन शहरातील इतरही मुख्य व वर्दळीच्या चौकांमध्ये जंक्शन बॉक्स संकल्पना राबविण्याचे नियोजन असल्याची माहिती शहर अभियंता संजय देसाई यांनी दिली.

# नेरूळमध्ये 'सीसीटीव्ही' बसविण्याच्या कामाचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ नोडमधील महापालिका प्रभाग ९६मध्ये भाजपच्या स्थानिक माजी नगरसेविका रुपाली किस्मत भगत यांच्या प्रयत्नांतून तसेच आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नेरुळ सेक्टर-१६, १६ए आणि १८ येथे सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे कामाचा शुभारंभ रविवारी (दि. १६) विभागातील स्थानिक ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आला.

प्रभागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी माजी नगरसेविका रुपाली किस्मत भगत यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या मागणीचा अविरत पाठपुरावा पालिका सभागृह, पालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, नेरुळ पोलीस ठाणे, स्थानिक आमदार यांच्याकडे लेखी निवेदनातून तसेच भेटीतून केला होता. अखेर हे काम मंजूर करून कामाला सुरुवात झाल्याने विभागातील नागरिकांनी स्थानिक आमदार मंदा म्हात्रे आणि स्थानिक माजी नगरसेविका रुपाली किस्मत भगत यांचे आभार मानले आहेत.

या कामाच्या शुभारंभाच्या वेळी माजी नगरसेविका रुपाली भगत, समाजसेविका विमल गांडाळ, कल्पना पाटील, छाया चव्हाण, ज्योती सरवदे, उषा सावंत, आरती मोढवे, सुनीता निमसे, समाजसेवक गणेशदादा भगत, संजय पाथरे, राजू तिकोने, प्रदीप कलशेट्टी, मधुसूदन पाडावे, गोरक्षनाथ गांडाळ, गणेश नाईकडे आदी उपस्थित होते.



# युलू बाईकचे नुकसान करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

युलू बाईकचे नुकसान करणाऱ्या तरुणांविरोधात नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सानपाडा पोलीस ठाण्यात तत्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी मनविसेचे नवी मुंबई उपशहराध्यक्ष योगेश शेटे यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे केली आहे.

शहरात महापालिकेने ठिकठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या युलू बाईकचा वापर नोकरदार, कामगार वर्गासह अनेक गरजू तरुणांना होत आहे. त्यासाठीचे शुल्कदेखील खिशाला परवडणारे असल्याने वाढत्या पेट्रोल दराच्या तुलनेत अनेकांकडून युलू बाईकला पसंती मिळत आहे, मात्र आता याच युलू बाईकचा तरुणांकडून गैरवापर होताना दिसत असल्याचे योगेश शेटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

काही धूम्रपान करणाऱ्या तरुणांच्या



टोळक्याने रविवारी (दि. १६) युलू बाईकला लाथ मारून खाली पाडले. त्यानंतर युलू बाईकवर दगड टाकून तिचे नुकसानदेखील केले. स्थानिक रहिवाशांनी तरुणांच्या टोळक्याला हटकले असता त्यांनी तिथून पळ काढला. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ तसेच छायाचित्रे तेथील एका स्थानिक रहिवाशाने आपल्या मोबाईलमध्ये कैद केला आहे. त्यामुळे घटनेचे गांभीर्य लक्षात घेता युलू बाईकचे नुकसान करणाऱ्या तरुणांच्या टोळक्यांवर सानपाडा पोलीस ठाण्यात तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.

# वाशीत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार मंदा म्हात्रे यांचा उपक्रम; ५५० नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून वाशी सेक्टर २ नवी मुंबई येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ५५० नागरिकांनी लाभ घेतला.

भाजपच्या सौजन्याने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लॉयन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स यांच्या सहकार्याने तसेच मयुरेश हॉस्पिटल तुर्भे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



महाआरोग्य शिबिरामध्ये रक्तदाब, डायबिटीस, बीएमआय, ईसीजी, डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला, मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या, तसेच मोफत औषधे, च्यवनप्राश व मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजप महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष विकास सोरटे, ज्येष्ठ समाजसेविक जेम्स आवारे, गणेश शिंदे, प्रमिला खडसे, वर्षा झरेकर, मालती सोनी, सुमेध पालवे, विशाल साबळे, लॉयन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स अध्यक्ष प्रताप मुधलियार, डॉ. अनिकेत सोनावणे, संदीप सुर्यवंशी, रिना अग्रवाल, मोहन कालबेरे तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते.

आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, नागरिकांचा उदंड प्रतिसाद पाहून समाधान वाटत आहे. वाशी येथील माझे अनेक सहकारी यांच्या सहकार्याने महाआरोग्य शिबिर होत आहे. वाशी येथील नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळावी, त्यांना मोफत औषधे उपलब्ध व्हावी हा यामागचा उद्देश आहे.

# विजय पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण येथील बापूसाहेब नेने फाउंडेशनच्या वतीने



युसुफ मेहरअली सेंटर संचलित भानुबेन प्रवीण शहा माध्यमिक विद्यालय, तारा येथे मागील २० वर्षांपासून अध्यापनाचे कार्य करणाऱ्या विजय पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात नुकताच पार पडलेल्या या सन्मान सोहळ्यात बापूसाहेब नेने फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज पुणे चे संस्थापक सदस्य श्रीकांत कल्लूरकर, समाजसेविका शुभांगी नेने, सोबती संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब नेने, फाउंडेशनच्या सचिव नीता कदम, सुधीर जोशी, वसंत आठवले व पेणच्या माजी उपनगराध्यक्ष्या वैशाली कडू आदींच्या उपस्थितीत विजय पाटील यांना शाल, श्रीफळ सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

# वाशीतील ध्वनी प्रदूषणावर ध्वनीरोधक भिंतीचा उतारा

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर २६ येथील तुर्भे रेल्वे यार्डात सिमेंट भराई मशिनमुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याने स्थानिकांनी आवाज उठवला होता. त्यांच्या या लढ्याला यश आले असून ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी रेल्वे यार्ड प्रशासनामार्फत या ठिकाणी आता ध्वनीरोधक भिंत उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

येथील रेल्वे यार्डातील सिमेंट भराई मशिनमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होऊन रहिवाशांना त्रास होत होता. याबाबत येथील रहिवाशांनी वारंवार तक्रारी आंदोलन करून प्रदूषण मंडळ, रेल्वे यार्ड प्रशासनास जाब विचारला



होता. याबाबत प्रदूषण मंडळाने आवाज कमी करण्याच्या तसेच या प्रकल्पाबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना रेल्वे यार्ड व्यवस्थापकांना दिल्या, मात्र त्यानंतरही परिस्थिती जैसे थेच राहिल्याने प्रदूषण मंडळाने भारतीय कंटेनर निगमला कारणे दाखवा नोटीस बजावून सात दिवसात खुलासा मागवला होता. त्यानंतर रेल्वे यार्ड प्रशासनाने या ठिकाणी ध्वनीरोधक भिंत उभारण्यास घेतली.

# पिरकोनमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**उरण : बातमीदार**

शालेय जीवनातील मित्र मैत्रिणींना जीवन प्रवासात विसरता येत नाही आणि येणारही नाही याचा प्रत्यय क. भा. पाटील विद्यालय पिरकोनच्या एसएससी बॅच १९८२च्या स्नेहमेळाव्यात आला. उरण तालुक्यातील चिरनेर येथील मानसी फार्महाऊसमध्ये झालेल्या या मेळाव्यात तब्बल ४९ मित्रमैत्रिणी एकत्र आल्या होत्या. ४१ वर्षानंतर एकमेकांना भेटल्याने आनंदाचे वातावरण पसरले होते.

मेळाव्याची सुरुवात सुप्रसिद्ध मेल फिमेल सिंगर मोहन फुंडेकर यांच्या सुमधुर आवाजातून साकारलेल्या गणेश स्तवनाने झाली. तद्नंतर ज्याचे चेहरे बदलले तरी ओळख, स्वभाव तेच असल्याचे प्रत्येकाने आपल्या ओळखीतून दाखवून दिले. कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध निवेदक आणि याच बॅचचे वर्गमित्र सुनिल वर्तक यांनी केले. 'कुछ रिश्ते मुनाफा नही देते, मगर जिंदगी को अमीर बनाते है और वो रिश्ता दोस्ती का होता है' असे सांगून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

शाकाहारी, मांसाहारी भोजन, नास्ता, शीतपेय, आईस्क्रीमच्या चवीने आणि फुंडेकरांच्या रंगीबिरंगी गीतांनी प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. राजन म्हात्रे, सुनील वर्तक, प्रविण वर्तक, विलास पाटील, भानुदास म्हात्रे, प्रकाश म्हात्रे आणि रवींद्र गावंड यांनी या स्नेहमेळाव्याच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला होता. पुढील गेट टू गेदर आधी ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक कार्य ही व्हावे ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवूनच करावे असा सर्वांनी निश्चय केला.





# शंकर वायदंडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल भीम महोत्सव रविवारी (दि. १६) आयोजक नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार यांच्या वतीने साजरा झाला. या वेळी महापालिकेचे माजी सभागृहात नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार शंकर वायदंडे यांना देण्यात आला.

शंकर वायदंडे पत्रकारीता क्षेत्रात काम करीत असून छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिराव फुले, शाहू महाराज या महापुरुषांचा आदर्श घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासत आहेत. पनवेलमधील सर्व सामान घटकांना न्याय देण्याचे आपल्या पत्रकारीतेच्या माध्यमातून करीत असून लोकांना वेळोवेळी मदतीला जात आहेत. त्यांच्या या कार्याचा आदर करीत नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी शंकर वायदंडे यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविले.

या वेळी अनेक मान्यवर व भिम अनुयायी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल सर्वच स्थरातून शंकर वायदंडे यांचे अभिनंदन होत आहेत.

# तुर्भे पादचारी पुलावर फेरीवाल्यांचा ताबा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत सध्या फेरीवाले अधिक दिसू लागले आहेत. बसायला जागा नसल्याने अगदी उड्डाणपूल, स्कायवॉकचादेखील हे फेरीवाले आसरा घेऊ लागले आहेत. त्यामुळे चालण्यासदेखील जागा नसल्याच्या तक्रारी नागरिक करीत आहेत.

ठाणे-बेलापूर महामार्गावरील तुर्भे नाका स्कायवॉकवर आता अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. याचा सर्वाधिक त्रास येथील नागरिक व व्यापारी वर्गाला होत आहे. तुर्भे नाका येथे औद्योगिक क्षेत्रात काम करणारे हजारो कामगार, झोपडपट्टी परिसरातील नागरिक, तसेच व्यावसायिक सुरक्षिततेच्या दृष्टीने याच स्कायवॉकचा वापर करतात, परंतु या पुलावर अनेक फेरीवाले सकाळ, दुपार आणि सायंकाळी प्रवाशांच्या चालण्याच्या रस्त्यावर बस्तान मांडून व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे पादचारी नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

याशिवाय स्वच्छतेअभावी पादचारी पुलाचे जिने कचराकुंड्या बनल्या आहेत. जुन्या पादचारी पुलाच्या जिन्यावर मातीचे थर तसेच खाद्यपदार्थांची रिकामी पाकिटे, गुटख्याच्या पिचकाऱ्या असल्याचे चित्र दिसू लागले आहे.

रात्री या ठिकणी बेघर लोकांची झोपण्यासाठी गर्दी होते. त्यातील काहीजण आपला अंथरूण पादचारी पुलावर असणाऱ्या लोखंडी अँग्लला बांधून ठेवतात, तर काही फेरिवाले बांबू, ताडपत्री आदी सामानही पादचारी पुलावर ठेवतात. त्यात अनेक गर्दुल्ले दिवसभर ठाण मांडून बसलेले असतात. पादचाऱ्यांच्या सोयीसाठी बनवलेल्या या पुलावर रविवारचा आठवडे बाजार बसल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे हा पूल पादचाऱ्यांच्या की फेरीवाल्यांच्या सोयीसाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



# पोलादपूर शहरातील डॉ. आंबेडकर भवनासाठी तीन कोटींचा निधी देणार

## आमदार भरत गोगावले यांची घोषणा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन या सामाजिक सभागृहाच्या उभारणीसाठी राज्यसरकारकडून तीन कोटींचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा आमदार भरत गोगावले यांनी केली.

पोलादपूर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंती दिनाचे औचित्य साधून समाजाच्या नियोजित सभागृहाच्या भुखंडावर आयोजित कार्यक्रमप्रसंगी आमदार गोगावले बोलत होते.

याठिकाणी सायंकाळी समाजातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांचे गुणगौरवपर सत्कार करण्यात आले. याचठिकाणी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास नियोजित सभेला सुरूवात झाली असता आमदार गोगावले, माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे आणि बौध्दजन सेवा संघ मुंबई अध्यक्ष आर.एस.जाधव, चिटणीस संजय खैरे, उपाध्यक्ष काशिनाथ मोरे, उत्सव कमिटीचे अध्यक्ष अनिल बाबू मोरे, सरचिटणीस राजेंद्र निकम, डॉ. गुलाबराव सोनावणे, बौध्दजन सेवा संघ तालुकाध्यक्ष संतोष मोरे तसेच समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी आर.एस.जाधव, पंकज मोरे, दीक्षा साळवी, सिध्दार्थ शिर्के, काशिनाथ मोरे, जी.डी.गमरे आदींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर तसेच त्यांच्या मौलिक उपदेश व कार्याबाबत विचार मांडले.

याप्रसंगी रूपेश जाधव, सोनू जाधव, जी.डी.गमरे, सचिन साळवी, बी.एल.मोहिते, सिध्दार्थ शिर्के, अशोक साळवी, विष्णू सकपाळ, आर.डी.मोरे, भरत जाधव, आनंद धोत्रे, रामदास जाधव, प्रकाश जाधव तसेच अन्य समाजबांधव उपस्थित होते.

या वेळी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. सकाळी निळे फेटे परिधान केलेल्या तरूणांच्या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

### संघटितपणाची गरज

**माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा मूलमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला असताना समाजातील गटातटांमुळे रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपण दिलेला २५ लाखांचा निधी परत गेल्याची खंत आपणास नेहमीच राहिल, असे सांगून समाजाच्या गटातटांमध्ये ऐक्याची संघटितपणाची भावना वाढीस लागली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या सामाजिक सभागृहाची उभारणी सहजशक्य होईल, असे मत आमदार गोगावले यांनी मांडले.**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सच्चे देशसेवक होते -अनंत राऊत

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सच्चा देशसेवक होते. देश उभारणीसाठी त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या विचारांचे सर्वांनी अनुकरण करायला हवे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द कवी व विचारवंत अनंत राऊत यांनी केले.

आरसीएफ थळ प्रकल्प भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आरसीएफ वसाहत कूरुळ येथील विश्वशांती बुद्धविहार येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात कवी अनंत राऊत बोलतं होते.

धर्म कधीच धोक्यात येत नाही. सत्ता धोक्यात आलेली असते. सत्तेसाठी धर्माचा वापर केला जातो. दगड एकमेकाला घसल्यावर ठिणगी पेटते याचा शोध आदिमानवाला लागला. आपल्या देशातील राजकारण्यांना धर्मांधतेचा शोध आहे. राजकारणी धर्म एकमेकांवर घासतात.यातून उडालेल्या ठिणगीतून लागणाऱ्या आगीत मानवता बेचिराख होते. धर्माधर्मात, जतिजातीत तेढ निर्माण करणाऱ्यांना विरोध करायाल हवा, असे कवी अनंत राऊत म्हणाले.

आरसीएफचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास मुडगेरीकर, आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक अनिरुध्द खाडिलकर, आरसीएफचे तांत्रिक संचालक मिलिंद देव यांनी देखील अपले विचार यावेळी व्यक्त केले. जयंती जयंती उत्सव समितीचे सचिव बापुराव मुरकुटे यांनी प्रास्ताविक केले. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष भालचंद्र देशपांडे यांनी आभाप्रदर्शन केले. सूत्रसंचालन संजय वानखेडे यांनी केले. वंदना संभाजी वाघमारे यांनी 'मी सावित्री बोलते' ही एकपात्री नाटिका सादर केली.




# पेणमध्ये डॉ. आंबेडकर जयंती महोत्सव

## समितीतर्फे भव्य मिरवणूक, विविध कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कमिटीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.

मोठ्या संख्येने बौद्ध बांधव या मिरवणुकीत सामील झाले होते. लहान मुलांपासून ते महिला, पुरुष यांनी बाबासाहेबांच्या गीतांवर व डीजेच्या तालावर जल्लोष साजरा केला. ही मिरवणूक पेण बुद्धनगर येथून निघून गांधी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीरमार्गे, खाटीक आळी, पं. का पाटील चौक, राजू पोटेमार्ग पेण नाका अशी नेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ या मिरवणुकीची सांगता झाली.

यानिमित्त ध्वजवंदन, बुद्धवंदनाचे कार्यक्रम झाले. या वेळी मुस्लिम बांधवाच्या वतीने मिरवणुकीत सामील बौद्ध बांधवांना पाण्याचे वाटप करण्यात आले.





# कंटेनरच्या धडकेत वीज खांबांचे नुकसान

## नेरळ-कळंब मार्गावरील घटना



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पूर्व परिसरात कंटेनरच्या धडकेत विद्युत महावितरणाचे आठहून अधिक विद्युत वाहून नेणारे खांब तुटून पडले तर काही वाकले आहेत. त्यामुळे येथील विद्युत महावितरणाचे मोठे नुकसान तर झाले शिवाय नेरळ पूर्व परिसरातील विद्युतपुरवठा सकाळपासून खंडित झाला. अपघातात चालक थोडक्यात बचावला.

नेरळ-कळंब या राज्य मार्गावरील नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्या लगत असणाऱ्या विद्युत रोहित्राच्या खांबाला पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास कंटेनर जावून धडकला. या धडकेने विजेचे सिमेंट खांब खाली कोसळून तुटून पडले तर काही लोखंडी खांब वाकले आहेत. यामध्ये चालक थोडक्यात बचावला मेन लाईनवरील विद्युत पुरवठा वेळीच बंद झाल्याने चालक बचावला.

सध्या नेरळ पूर्व परिसरात विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला असून महावितरण अधिकारी व कर्मचारी काम युद्धपातळीवर सुरू आहे. काही परिसरातील विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात येणार असून काही परिसरातील विद्युत पुरवठा खंडित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. क्रे. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक ०२/०५/२०२३ रोजी दुपारी ०३:०० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ९८/२०२२-२३ | श्री. सिराज बशीर शेख (श्री. सुरेश ईश्वर कांबळे, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क्र. ५४२, फारशीपाडा, पो. तळोजा, ता. पनवेल, जि- रायगड | १,९२,७५८/- |
| २. | ९९/२०२२-२३ | श्री. समीर शहाजी आजबे (कर्जदार) | घर क्र. २२८, बि.नं.२, रूम नं.२३, वसंत नगर, गावदेवी धाब्याजवळ, नेवाळी, ता.पनवेल, जि. रायगड | २,१४,००४/- |
| | | श्री. अमोल छगन कर्डीले (जामिनदार) | मु.बी-२, फ्लॅट नं. ३०४, विहीघर, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ३. | १०१/२०२२-२३ | श्री. ईसा शब्बीर पटेल. (कर्जदार) | घर क्र. ७८, तळोजा पचनंद, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | २,८०,८८५/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे
जा.क्र. ९३४
स्थळ : पनवेल
दिनांक : १२/०४/२०२३

**सही/-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

# चौलमधील जागृत आणि प्राचीन मंदिरात पर्यटक, भाविकांची गर्दी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐतिहासिक नगरी चौल अशी ओळख जपलेल्या चौल मध्ये जागृत व प्राचीन मंदिरे पहावयास मिळतात. ऐन एप्रिल, मेच्या सुट्‌टीमध्ये पर्यटक, पै-पाहूणे चौल परिसरात आले असून चौलमधील जागृत व प्राचीन मंदिरात श्रध्दा व भक्तीने भेट देत आहेत.

चौलच्या ऐतिहासिक नगरीत अनेक मंदिरे आजही प्रसिध्दीस आहेत. यामध्ये चौल शितळादेवी, भगवती देवी, महालक्ष्मी देवी, महाकाली देवी, चंपावती देवी, श्री रामेश्वर, श्री हरेश्वर, पर्वतवासी श्री दत्त मंदिर, मुखरी गणपती आदी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी सध्या दिसून येत आहे. यामध्ये ऐन उन्हाळी सुट्टीत मुंबईचे चाकरमणी, पै-पाहूणे, तसेच पर्यटक यांचा मोठा समावेश आहे. चौलमध्ये आल्यावर निश्चितपणे चौलच्या प्रसिध्द मंदिरात चाकरमणी, पै-पाहूणे दर्शनाचा लाभ घेत असतात.

या मंदिराकडे जाण्यासाठी रिक्षाची सुविधा चौल नाका येथे उपलब्ध आहे. तर चौलच्या प्रसिध्द मंदिर परिसरात हार फुले व श्रीफळ विक्रेते यांची गर्दी सुध्दा दिसते. सध्यस्थितीत मंदिराकडे पै-पाहूणे, चाकरमणी तसेच पर्यटक येत असल्याने यांचा व्यवसाय सुध्दा तेजीत आहे असे चित्र दिसते. एकूणच भाविकांच्या गर्दी वाढल्याने मंदिर परिसर गजबलेला असून भक्तीमय वातावरण पहावयास मिळत आहे.

चौलच्या माड व बागायतीच्या निसर्गरम्य व मनाला शांतता देणार्या परिसराची आवड पर्यटकांना नेहमीच असते, चौल मधील नारळ शहाळे, आंबे, कोकम, ताडगोळे, आदी फळांचा आस्वाद घेत सुट्टीचे-विरंगुळाचे दिवस चौल मध्येच रहावे, अशी भावना प्रत्येकांची असते. दिवसभर चौलमधील शांत वातावरणाचा सहवास घेऊन सायकांळी रेवदंडा समुद्र किनारी जाऊन सुट्टीचा मनमुराद आनंद येथे येणारे पै-पाहूणे, पर्यटक नेहमीच घेतात.

### ग्रामपंचायत आकुर्ली

ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र.०४/ग्रा.पं./आस्था २०२३
ग्रामपंचायत आकुर्ली
दिनांक १७/०४/२०२३

**जाहीर दरपत्रक सूचना**

ग्रामपंचायत आकुर्लीसाठी २०२३/२०२४ या सालाकरीता ग्रामपंचायत फंडातुन वस्तु खरेदी करावयाच्या आहेत. त्यासाठी मान्यताप्राप्त पुरवठादारांकडुन दि. १८/०५/२०२१ ते २१/०५/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात जाहीर दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रक दि. २४/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाधारक अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र | वस्तु/साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | सन | नग |
|---|---|---|---|---|
| १ | दिवाबत्ती साहित्य खरेदी करणे.<br>१. स्ट्रीट लाईट लोखंडी पोल खरेदी करणे.<br>२. एल ई डी स्ट्रीट लाईट खरेदी<br>३. सर्विस वायर खरेदी करणे.<br>४. स्ट्रीट लाईट टाईमर खरेदी करणे.<br>५. एम सी बी व एम सी बी बॉक्स खरेदी करणे.<br>६. डिपी खरेदी करणे.<br>७. आर मार्ट केबल खरेदी करणे.<br>८. इन्सूलन्स टेप खरेदी करणे. | ग्रामनिधी | २०२३/२०२४ | ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार |
| २ | आरोग्य विषयक साहित्य खरेदी करणे<br>१. गावातुन निर्माण होणारा कचरा डंपिंग ग्राउंडवर सिप्टींग करणे<br>२. क्लॉराईट बॉटल खरेदी करणे.<br>३. गारबेच पावडर खरेदी करणे.<br>४. बिचीग पावडर खरेदी करणे.<br>५. धूर फवारणी औषध खरेदी करणे.<br>६. मच्छर फवारणी औषध खरेदी करणे.<br>७. औषध फवारणी मशीन साठी डिझेल व पेट्रोल खरेदी करणे.<br>८. नेट जाली (हिरवी) खरेदी करणे.<br>९. झाडू (खराटा) खरेदी करणे.<br>१०. मेजर टेप खरेदी करणे.<br>११. लोखड़ी पारई खरेदी करणे<br>१२. तोडाचे मास व हॅंडग्लोज खरेदी करणे.<br>१३. चुना खरेदी करणे.<br>१४. लोखंडी व प्लॅस्टिक घमेले खरेदी करणे.<br>१५. लोखंडी फावडे खरेदी करणे. | ग्रामनिधी | २०२३/२०२४ | ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार |
| ३ | अंगणवाडी व शाळेसाठी टी.व्ही -२, एक्वागार्ड, MPR, उंची पट्टी, कोरे कागद -२ पंच, खुर्चा मोठया-२, लहान मुलाच्या बसण्यासाठी खुर्च्या ८०, मुलांसाठी गणवेश ८० खरेदी करणे. -<br>अगणवाडी २ चे भाडे भरणे. | ग्रामनिधी | २०२३/२०२४ | ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार |
| ४ | कार्यालयासाठी लागणारे कार्यालयीन साहीत्य पुरविणे. | ग्रामनिधी | २०२३/२०२४ | ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार |
| ५ | अपंगासाठी लागणारे साहीत्य खरेदी करणे. | ग्रामनिधी | २०२३/२०२४ | ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार |

**अटी व शर्ती**

१. सर्वात कमी दराने अथवा कोणतेही दरपत्रक मंजुर अगर नामंजुर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाही.
२. वस्तुचे दरपत्रक ऑफिस वेळेत येऊन दयावे.
३. वस्तुचे दर बाजारभाव प्रमाणे असावे व भाजारभावा पेक्षा जास्त नसावे.
४. दिलेल्या मुदतीत वस्तू ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध न झाल्यास आपला दरपत्रक रद्द करण्यात येईल व केलेली मागणी रद्द समजण्यात येईल.
५. साहित्य व वस्तुचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(जयेंद्र घनशाम म्हात्रे)**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. भारती सचिन पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# तुपगाव येथे संत गोरोबा काका कुंभार यांची पुण्यतिथी साजरी



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तूपगाव येथे सालाबादप्रमाणे यंदाही संत गोरोबा काका कुंभार यांची पुण्यतिथी साजरी होत आहे. पहाटे मूर्तीचे पूजन, अभिषेक असे धार्मिक कार्यक्रम सरपंच रवींद्र कुंभार आणि मान्यवरांच्या हस्ते झाले.

रविवारपासून सलग चार दिवस सप्ताहाचा कार्यक्रम सुरु झाला. दररोज पहाटे काकड आरती, पारायण, प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, रात्री कीर्तन व त्यानंतर जागर भजन हे कार्यक्रम होणार आहेत. ह.भ.प. वसंत महाराज कुंभार, ह.भ.प. भगवान महाराज आपटेकर, शंकर कुंभार, नामदेव कुंभार, रघुनाथ कुंभार, दत्ता हत्नोलकर, दत्ता कुंभार, ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, ग्रामपंचायत सदस्य ताई नागावकर, कुंभार समाज खालापूर तालुका अध्यक्ष राजेंद्र साळवी, खालापूर तालुका युवक अध्यक्ष स्वप्निल नागावकर, कुंभार समाज तूपगाव आणि ग्रामस्थ मंडळ तुपगाव यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून भाविकांनी श्रवणसुखाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. क्रे. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक ०२/०५/२०२३ रोजी दुपारी ०३:०० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १०३/२०२२-२३ | श्री. सिराज बशीर शेख (श्री. सुरेश ईश्वर कांबळे, कर्जदार यांचे जामिनदार) | घर क्र. ५४२, फारशीपाडा, पो. तळोजा, ता. पनवेल, जि- रायगड | ३५,१२२/- |
| २. | १०४/२०२२-२३ | श्री. समीर शहाजी आजबे (कर्जदार) | घर क्र. २२८, बि.नं.२, रूम नं.२३, वसंत नगर, गावदेवी धाब्याजवळ, नेवाळी, ता.पनवेल, जि. रायगड | ५४,४८५/- |
| | | श्री. अमोल छगन कर्डीले (जामिनदार) | मु.बी-२, फ्लॅट नं. ३०४, विहीघर, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ३. | १०६/२०२२-२३ | श्री. ईसा शब्बीर पटेल. (कर्जदार) | घर क्र. ७८, तळोजा पचनंद, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | ९९,१०२/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे
जा.क्र. ९३५
स्थळ : पनवेल
दिनांक : १२/०४/२०२३

**सही/-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

# राजस्थानची 'रॉयल' कामगिरी

## गुजरातवर रोमांचक विजय

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या दुसर्‍या सत्रातील सामन्यात राजस्थान रॉयल्सने तीन गडी राखून गुजरात टायटन्सवर रोमांचक विजय मिळवला. हेटमायर विजयाचा शिल्पकार ठरला. गुजरात टायटन्सने २० षटकांत सात गडी गमावून १७७ धावा केल्या होत्या. राजस्थानने हे लक्ष्य शेवटच्या षटकात चार चेंडू आणि तीन गडी राखून पार केले.

धावांचा पाठलाग करताना राजस्थानची सुरुवात खराब झाली. संघाने तीन षटकांत दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. दुसर्‍या षटकात एक धाव घेत यशस्वी जैस्वाल बाद झाला. यानंतर तिसर्‍याच षटकात जोस बटलर खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. देवदत्त पडिक्कल काही वेळ क्रीजवर राहिला आणि २५ चेंडूंत २६ धावा करून बाद झाला. रियान पराग पुन्हा एकदा स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. कर्णधार संजू सॅमसनने शिमरॉन हेटमायरसोबत पाचव्या विकेटसाठी ५०हून अधिक धावांची भागीदारी करून




संघाला विजयाच्या जवळ पोहचण्यास मदत केली. सॅमसन ३२ चेंडूंत ६० धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत सहा षटकार आणि तीन चौकार लगावले. ध्रुव जुरेल १८ धावा करू शकला. यानंतर अश्विन झंझावाती खेळी खेळताना तीन चेंडूंत १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. शिमरॉन हेटमायरने एका टोकाकडून फलंदाजी सुरू ठेवली आणि अखेरच्या षटकात षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला. तो ५६ धावा करून नाबाद राहिला. गुजरातकडून मोहम्मद शमीने सर्वाधिक तीन बळी घेतले. दोन विकेट्स राशिदने घेतल्या, तर कर्णधार हार्दिक पांड्या आणि नूरला प्रत्येकी एक यश मिळाले.

तत्पूर्वी डेव्हिड मिलरच्या ४६ आणि शुबमन गिलच्या ४५ धावांच्या खेळीनंतरही राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सला सात बाद १७७ धावांवर रोखले. मिलरने ३० चेंडूंच्या खेळीत तीन चौकार आणि दोन षटकार मारत सहा धावांवर मिळालेल्या जीवदानाचा फायदा घेतला. गिलने ३४ चेंडूंच्या खेळीत चार चौकार आणि एक षटकार मारण्याव्यतिरिक्त कर्णधार हार्दिक पांड्यासोबत तिसर्‍या विकेटसाठी ३३ चेंडूंत ५९ धावांची भागीदारी केली. पांड्याने १९ चेंडूंत तीन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २८ धावा केल्या.

अखेरच्या षटकात अभिनव मनोहरने १३ चेंडूंत तीन षटकारांच्या मदतीने २७ धावा ठोकून संघातील आपली निवड सार्थ ठरवली. त्याने मिलरसोबत पाचव्या विकेटसाठी २२ चेंडूंत ४५ धावांची भागीदारी केली. संघाने शेवटच्या चार षटकात ५२ धावा जोडल्या. राजस्थानकडून संदीप शर्माने चार षटकांत २५ धावा देत दोन बळी घेत पुन्हा एकदा प्रभावित केले. ट्रेंट बोल्ट, अ‍ॅडम झम्पा आणि युझवेंद्र चहल यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

# एक धाव स्वच्छतेसाठी...!

## कर्जतमध्ये मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद




(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अंतर्गत कर्जत शहरामध्ये मॅरेथॉन २०२३ एक धाव स्वच्छतेसाठीचे आयोजन केले होते. सहा गटात ही स्पर्धा आयोजित केली होती. या मॅरेथॉनमध्ये सुमारे ६०० अबालवृद्धांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्जत शहराच्या इतिहासात ही पहिली मॅरेथॉन ठरली.

कर्जत पालिकेने रोटरी क्लब, ज्येष्ठ नागरिक संस्था, उत्कर्ष इव्हेंट, संस्कार भारती, एसबीआय लाईफ यांच्या सहकार्याने मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. १५ वर्षांवरील स्पर्धकांचा पुरुष खुला गट, महिलांचा खुला गट, १४ वर्षांखालील मुलांचा व मुलींचा गट, ज्येष्ठ नागरिक पुरुष व महिला गट यांची आठ किलोमीटर, चार किलोमीटर, दोन किलोमीटर अशा अंतराची स्पर्धा घेण्यात आली. पालिका कार्यालयासमोरून स्पर्धा सुरू होऊन पुन्हा तेथेच शेवट करण्यात आला.

सुरुवातीला उपस्थितांना स्वच्छता व हरिततेची शपथ देण्यात आली. त्यानंतर नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेवक राहुल डाळिंबकर, बळवंत घुमरे, विवेक दांडेकर, हेमंत ठाणगे, संचिता पाटील, प्राची डेरवणकर आदींच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून विविध गटांच्या स्पर्धेची सुरुवात झाली. ७ ते ७५ वयोगटातील स्पर्धक स्पर्धेत सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या मॅरेथॉनमध्ये नगराध्यक्ष जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, माजी नगरसेविका बिनीता घुमरे, खो खो या राष्ट्रीय खेळाडू मुक्ता झरेकर हेही धावले.

या स्पर्धेसाठी अमित विचारे, समीर शिंदे, स्वप्नील नामदास, दीपक राणा, कौस्तुभ कदम, दिनेश भुसारी, प्रणित निमने यांनी रेफ्री आणि पायलट म्हणून काम केले. संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन उत्कर्ष इव्हेंटचे प्रदीप गोगटे यांनी खास शैलीत करून रंगत आणली. नगराध्यक्ष जोशी यांनी आभार प्रदर्शन मानले. या वेळी रोटरी क्लबच्या वतीने कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेच्या वेळी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या स्पर्धेवेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे, जितेंद्र ओसवाल, विशाल शहा, सुनील सोनी, दीपचंद ओसवाल, जितेंद्र परमार, अरविंद जैन, हुसेन जमाली, डॉ. प्रेमचंद जैन, डॉ. बी. एल. पाटील, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र नातू, संस्कार भारतीचे पांडुरंग गरवारे, केतन जोशी, एसबीआय लाईफचे विकास व्यवस्थापक समीर भोईर, उत्तम पाटील, प्रकाश नगरकर, प्रभाकर करंजकर, मुकुंद भागवत, प्रा. प्रकाश नाखाडे, संदीप पाटील आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्पर्धेचा निकाल

**१४ वर्षांखालील मुले गट**

प्रथम क्रमांक : लोकेश आडे (पाच हजार ५५५ ) रुपये द्वितीय : आयुष नाकाडे (तीन हजार ३३३ रुपये), तृतीय : पोरोमित खरात एक हजार १११ रुपये) सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र

**१४ वर्षांखालील मुली गट**

प्रथम : दिव्या राणा (पाच हजार ५५५ रुपये), द्वितीय : बेला घरत (तीन हजार ३३३ रुपये), तृतीय : गायत्री बडेकर एक हजार १११ रुपये) सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र

**१५ वर्षांवरील पुरुष खुला गट**

प्रथम : शिरीष पवार (११ हजार १११ रुपये), द्वितीय : मयूर भोईर (सात हजार ७७७ रुपये), तृतीय : पवन प्रजापती (पाच हजार ५५५ रुपये) समानचिन्ह व प्रशस्तीपत्र

**१५ वर्षांवरील महिला खुला गट**

प्रथम : प्रगती पाटील (११ हजार १११ रुपये), द्वितीय : तन्वी मरागजे (सात हजार ७७७ रुपये), तृतीय : धनश्री जोशी (पाच हजार ५५५ रुपये) सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र.

**ज्येष्ठ नागरिक पुरुष गट**

प्रथम : बळीराम भालेराव, द्वितीय : दीपक देशमुख, तृतीय : श्रीराम गांगल यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**ज्येष्ठ नागरिक महिला गट**

प्रथम : चारुशीला पिसाट, द्वितीय : सायली कुंभार, तृतीय : मुक्ता झरेकर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# सचिन आणि अर्जुनमध्ये अजब योगायोग!

## सारा तेंडुलकरने शेअर केली आयपीएल पदार्पणाची पोस्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुनने रविवारी आयपीएलमध्ये पदार्पण करीत मुंबई इंडियन्सकडून पहिला सामना खेळला. सामन्यानंतर अर्जुनची बहीण साराने वडील आणि भावाच्या पर्दापणाबाबतची एक खास पोस्ट शेअर केली.



दोन हंगाम बेंचवर बसल्यानंतर अखेर अर्जुन तेंडुलकरला पदार्पण करण्याची संधी मिळाली. अर्जुनची मोठी बहीण आणि सचिनची मुलगी सारा तेंडुलकरही हा सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित होती. सामन्यादरम्यान अर्जुनला पहिले षटक टाकायला मिळाले. तेव्हा साराच्या आनंदाला पारावार उरला नाही. ती टाळ्या वाजवून भावाच्या कर्तृत्वाचा आनंद साजरा करीत होती.

साराने अर्जुन तेंडुलकरशी संबंधित एक रेकॉर्ड शेअर केला, जो दर्शवितो की अर्जुन त्याच्या वडिलांच्या मार्गावर चालत आहे. अर्जुनने रविवारी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या पहिल्याच षटकात पाच धावा दिल्या. सचिन तेंडुलकरनेही २००९ साली केकेआरविरुद्ध आयपीएलमध्ये पहिले षटक टाकले होते आणि त्यातही त्याने केवळ पाच धावा दिल्या होत्या.

दरम्यान, सचिन आणि अर्जुन तेंडुलकर ही आयपीएलमध्ये एकाच संघासाठी खेळणारी पहिली पिता-पुत्र जोडी ठरली आहे. मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सचा पाच गडी राखून पराभव केला. मुंबईचा या स्पर्धेतील हा सलग दुसरा विजय आहे. त्याचवेळी कोलकाताचा तिसरा पराभव आहे.

# अभिजीत स्ट्राईकर्स संघ एलपीएलचा विजेता



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या लाईन आळीतील शिवशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांच्या नेतृत्वाखाली लाईन आळी प्रीमिअर लीग (एलपीएल) २०२३ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अभिजीत स्ट्राईकर्स संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

अंतिम सामन्यात संदीप पाटील यांच्या अभिजीत स्ट्राईकर्स संघाने पंकज पडवळ यांच्या पी. पी. पँथर संघावर विजय मिळवित विजेतेपदाला गवसणी घातली. संस्थेचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांच्या हस्ते दोन्ही संघांना चषक देऊन गौरविण्यात आले.

# ज्युनियर मुलींची क्रिकेट निवड चाचणी शुक्रवारी भेंडखळ येथे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे ज्युनियर (१९ वर्षांखालील) मुलींची निवड चाचणी येत्या शुक्रवारी (दि. २१) उरणमधील भेंडखळ क्रिकेट अकॅडमी येथे आयोजित करण्यात आली आहे.

या निवड चाचणीतून रायगड जिल्ह्याचा १९ वर्षांखालील मुलींचा संघ निवडण्यात येणार आहे. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणार्‍या १९ वर्षांखालील मुलींच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होईल.

१ सप्टेंबर २००४नंतर जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील मुलींनाच या निवड चाचणीत प्रवेश मिळेल. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपल्या आधार कार्डाची स्वतःच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत, आधार कार्डची मूळ प्रत, स्वतःची दोन रंगीत पासपोर्ट साईज छायाचित्रे, जन्मदाखला सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

स्वतःच्या किटसह व पांढर्‍या पोशाखात खेळाडूंनी २१ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजल्यापासून भेंडखळ क्रिकेट अकॅडमी, उरण येथे उपस्थित राहावे.

अधिक माहितीसाठी प्रशांत ओक (९८२२४२२६७६), संदीप पाटील (९९२०५४८१८१), विनय पाटील (९०८२५८२९०५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी केले आहे.

# जलतरणपटू वेदांत माधवनची सातत्यपूर्ण कामगिरी

## मलेशियन स्पर्धेत जिंकली पाच सुवर्णपदके



**मुंबई : प्रतिनिधी**

दाक्षिणात्य आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणार्‍या आर. माधवनचा मुलगा वेदांत जलतरण या क्रीडा प्रकारात सातत्यपूर्ण कामगिरी करतोय. नुकतेच वेदांतने क्वालालंपूर येथे झालेल्या स्पर्धेत पाच सुवर्णपदके जिंकली आहेत.

आर. माधवनने एक पोस्ट व काही फोटो शेअर करीत मुलाच्या कामगिरीची माहिती दिली. 'देवाच्या कृपेने आणि तुमच्या सर्व शुभेच्छांनी वेदांतने क्वालालंपूर येथे या शनिवार व रविवारी आयोजित मलेशियन इन्व्हिटेशन एज ग्रुप चॅम्पियनशिप २०२३मध्ये भारतासाठी पाच सुवर्ण (५० मी, १०० मी, २०० मी, ४०० मी आणि १५०० मी) पदके जिंकली. मी खूप आनंदित आणि कृतज्ञ,' असे माधवनने त्याच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

आर. माधवनचा मुलगा व राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू असलेल्या वेदांतच्या या कामगिरीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. चाहत्यांसह राजकीय नेतेमंडळीही वेदांतचे कौतुक करताना दिसत आहेत.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com